# मनमंदिरा

## (जीवनपर कवितासंग्रह – भाग १)


रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)



मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**मनमंदिरा** (जीवनपर कवितासंग्रह - भाग १)
**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.
**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : फाल्गुन शु. ८, शके १९४५,
रविवार, दि. १७ मार्च, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १-एन, सेक्टर ए, एन-१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-962298-4-9
**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन
**किंमत** : ₹ २००/-

# समर्पण



**जीवनाचा अर्थ समजावून सांगताना**
**जीवनाला अर्थ देणाऱ्या माझ्या सर्व गुरुजनांना**
**हा जीवनपर कवितासंग्रह**
**सदार सविनय**
**समर्पित**

# मनोगत

जन्म व मृत्यूच्या मधल्या कालावधीला जीवन म्हणतात. हा कालावधी अनिश्चित असतो. माणसे श्वास घेतात हे खरे पण जगतात का? हा प्रश्नच असतो. मुळात जीवनाकडे पाहण्याचा प्रत्येकाचा दृष्टिकोन अतिशय वेगवेगळा असतो अथवा कधी कधी तर जीवनाकडे पाहण्याची दृष्टीच विकसित झालेली नसते.

कविमनाने जगण्याच्या प्रत्येक पैलूवर मन विसावते तेव्हा जीवनपर कविता उतरत जातात. हा दृष्टिकोन जरी कवयित्री म्हणून माझा असला तरी तो रसिकहृदयाचा ठाव घेणारा असल्याने त्याचेच जीवन उलगडवणारा ठरतो.

जीवन म्हणजे तर सोपे, म्हटले तर अवघड, केवळ त्याला जगताना मनात एक उमेद जिवंत हवी, कुणाचा स्नेह, कुणाचे वात्सल्य, कुणाची ओढ हृदयात हवी. भोवतालच्या प्रत्येक बाबीत जीवन जर गवसू लागले तर मग त्याचा नव्याने शोध घेण्याची गरजच पडत नाही.

रसिकांना या जीवनपर कविता जीवनासाठी हव्या हव्याशा वाटतील, तरच या सफल होतील.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# अनुक्रमणिका


१) गर्वाचे घर निश्चित खाली... ७
२) चंद्राआडचं आभाळ ... ८
३) कार्य ... १०
४) स्वर ... ११
५) सुन्न मनाची विषण्ण दारे... १२
६) काट्याकुट्यातून डोले फूल ... १३
७) कसे सांगू तुला ... १४
८) सगळे जीवन जरतारी क्षण... १५
९) व्रत दानाचे चालो निरंतर ... १६
१०) सुगंध दरवळ कस्तुरी शोधणं... १७
११) मी साऱ्यांचे गीत लिहिते... १८
१२) जीवन चंदन गंध हे स्पंदन... १९
१३) माय शाळेचे सांगणे ... २०
१४) म्हणून दुःख हे सख्या चांगले ... २१
१५) गठडी ही पूर्वजांची ... २२
१६) समर्पण ऐसे अलौकिक... २३
१७) आयुष्याचा पट खेळाचा... २४
१८) आज कवेत हा चांद ... २५
१९) बालक एक बिचारे ... २६
२०) मी फाडली वही ... २७
२१) मन कमळ फुलून यावं ... २८
२२) सूर्य उगवता सोने पसरे ... २९
२३) दोन क्षितिजे ... ३०
२४) भावनांच्या रे होड्या ... ३१
२५) आज हसले गोकर्ण ... ३२
२६) होती बहार जेव्हा ... ३४
२७) उगा शांत बसलो मी ... ३६
२८) रंग वेगळे जगून घ्यावे ... ३८
२९) रंग छटुल्या ... ४०
३०) फुलून मोगरा ... ४२
३१) रंग तबकडी नभ ... ४४
३२) केवळ शिवास हृदयी ... ४६
३३) असे हसावे मनमोकळे ... ४८
३४) कुणी कुणाला घाबरण्याचे ... ५०
३५) अंगणातील ही अबोली... ५१
३६) सुंदरतेला ना मर्यादा ... ५२
३७) सोनचाफी अभिलाषा ... ५३
३८) आधी उल्हास त्यात फाल्गुन मास ... ५४
३९) आर्त व्याकुळ हाक माझी... ५५
४०) होत काजवा जीवनी ... ५६
४१) फुलपाखरू होऊन ... ५७
४२) मनी सणाचा गोडवा ... ५८
४३) एक नवाच प्रवास ... ५९
४४) नसतेस घरी तू आता जेव्हा ... ६०
४५) कवडसा ... ६१
४६) चित्रस्वर हे रंगती ... ६२
४७) पिंपळ पानी मन उतरावे... ६३
४८) मुक्त गगनी दे भरारी ... ६४
४९) नभ मोकळे झालेले ... ६५
५०) हासलेले मोती वेच ... ६६

५१) नाते तिचे नि माझे ... ६७
५२) पुस्तकांची कांती ही ... ६८
५३) कवाड ... ६९
५४) आई अशीच ... ७०
५५) प्रेम कृष्ण नाव ... ७२
५६) गंध जगण्याचा यावा ... ७३
५७) पैकं सुगंधी सुगंधी ... ७४
५८) शिकवण वैशाखाची ... ७५
५९) प्रेमाचे किती रूपक प्यारे... ७६
६०) प्रेमाची शिदोरी वेगळी गं... ७७
६१) ती किनार ओली होती... ७८
६२) त्यागी असतो वंद्य निरंतर...७९
६३) प्रतिबिंबाच्या आतून मी... ८०
६४) समर्पण ऐसे अलौकिक... ८१
६५) माझेच गीत मी उलगडले... ८२
६६) मृगराज ... ८३
६७) जगणे सुंदर मोह जाळी हा... ८४
६८) कोष ... ८५
६९) माय डोंगराची माया ... ८६
७०) बाप आधार आधार ... ८७
७१) सुंदर जगण्या जमवा भट्टी ... ८८
७२) जगणे असते असे ताटवे ... ८९
७३) फुलते मनी उद्यान ... ९०
७४) देवपण ते उजवं ... ९१
७५) केतकीचे उमलणे ... ९२
७६) नव्या फुलांचे
रंगही घेशील ... ९३
७७) फिटे पारणे दो नयनांचे ... ९४
७८) ऋतुचक्र ... ९५
७९) प्रपात ... ९६
८०) आभाळमाया ... ९७
८१) आनंद असू दे क्षणभरी ... ९८
८२) जरा पाहू दे ती सुंदरता ... ९९
८३) अन संध्येचा
स्वर गहिवरला ...१००
८४) पाझर ...१०१
८५) पुन्हा गुंतलो थेंबांमधुनी...१०२
८६) चरित्र ...१०३
८७) हळवे सुगंध सजवावे ...१०४
८८) जगण्याला मेजवानी ...१०५
८९) रिक्तपणे मन सावर ...१०६
९०) पावलात जान आली ...१०७
९१) सुखा बिलगते पाती ...१०८
९२) जरा उंबऱ्यापाशी थांबून...१०९
९३) सारं देऊन डोंगर ...११०
९३) मालवताना कुडी जीवाची... ११२
९५) वेदनेचे घोट ...११३
९६) तक्रार ...११४

## (१)
## गर्वाचे घर निश्चित खाली

कशा कशाचा करशील गर्व
जे नाही आपुले ते सर्व
ढेकीमध्ये मिरवून घेशील
धुळीत सारे मिसळून देशील

रूप वाटते तुज गर्वाचे
सजवीशी त्याला जणू परवाचे
मन किळसवाणे आतून सडले
चेहऱ्यावरती पावडर पडले

काळवंडूनी जाईल मुखडा
कायमचा तो होईल दुखडा
मनदर्पण तो असू दे चेहरा
दूर करी रे चिंता भोवरा

सत्ता संपत्ती ज्ञानाचा
गर्व नको कधी धनमानाचा
पारडे क्षणात उलटून जाईल
क्षण एक पुरे बघ सन्मानाचा

कधी फुशारी खोट्याची ती
खोट्यावरती तुझी मदार
सत्य राहते टिकते विजयी
म्हणून मनाशी कर रे उदार

कधी चुकलेले मान्य न करीशी
पापघडे तू सदैव भरीशी
मोद मिळवी खिजवून इतरांशी
काळ करेल बघ ऐशीतैशी

पदोपदी फसवून चालशी
किती शहाणा स्वतः तोलशी
कित्येक आले धडगत नाही
गर्वाचे घर निश्चित खाली
गर्वाचे घर निश्चित खाली

दि. ०५/०५/२१
सकाळी ०८.४६ वा.



## (२)
## चंद्राआडचं आभाळ

चंद्राआडचं आभाळ व्हायला
मन मोठं लागतं रे
चंद्र झेलून मागे राहणं
सांग कुणाला जमतं रे

स्तुती झाली तर होईल शशीची
आभाळ रिक्त असेच ना
तेजाला त्याच्या सांभाळूनही
आभाळ अंधार लेतेच ना

चंद्र आला की गोळा चांदण्या
एरवी कोणी फिरके ना
काळ ढकलावा म्हटलं तरीही
कृष्णपक्ष हा सरके ना

ती भयानक रात्र काळोखी
अमावस्याही परकी ना
आभाळाला दोन्ही सारख्या
पूनम अथवा अमावस्या

ते एकाकी जगणे अवघड
एकटेच ढग पोसणे ना
चंद्र तारे पाऊस इंद्रधनू
सगळे इतरांस्तव असणे ना

हसले तर ते पडे चांदणे
काळोखाने कृष्ण निळा
गप्प बसे तर घुम्म आभाळ नि
गर्जत असता घन बावळा

स्वच्छ दिसे तर पिंजला कापूस
गरजे तर मग बरसेल काय
पाऊस पाडून पाहतो तेव्हा
श्रेय मृगाला वर्षी जाय

चंद्राआडचं आभाळ होणं
आधार केवळ बनून ऱ्हाय
कधी ना नशिबी कौतुक येईल
खापर फुटलं जाईल पहाय

चंद्राआडचं आभाळ हसरं
दुःख कुणाला समजे ना
असून नसून कुणी ना आपुले
जखम कुणाला उमजे ना

चंद्राआडचं आभाळ होणं
धुमसून गुपचूप रडणं फार
सुखास थारा नाही कधीही
दुःख बोचरे, अति धारधार

दि. २९/०४/२१
सायं. ०५.२१ वा.

## (३)
## कार्य

कार्य म्हणजे कृती आपुली
सत्कर्माची गती चांगली
कुकर्म घडता फळही तैसे
कर्माचे हे संचित ऐसे

कार्य सुरू ते जन्मापासून
कळता न कळता जातो व्यापून
कार्य साथीला जन्मभरी ते
कार्यासाठी इच्छा आतून

माणूस गणला जातो त्याच्या
हातून घडल्या कार्यामधुनी
कार्य आरसा असते त्याच्या
वैचारिक मर्माचा आतुनी

कार्य करावे कर्तव्याचे
म्हणून गीता बोधन पार्था
भगवंताने कार्यासाठी
अवतरुन केले परमार्था

कार्य शुभाशुभ दोन्ही असते
मंगल कार्या जमतील सारे
कार्य अमंगळ करणे जेव्हा
एकटाही कुणी त्यास पुरे रे

कार्यासाठी झटला कोणी
कार्यासाठी झिजला कोणी
कार्य साधण्या स्वार्थी कोणी
कार्यास्तव दे प्राणही कोणी

कार्याचीच प्रशंसा होते
पारितोषिके बहाल होती
कार्याचीच चिडून विटंबना
कार्याने मानापमान ही

माणूस उरतो कार्यरूपाने
माणूस ठरतो कार्य करण्याने
कार्यकरणाने जगताचे मग
संचालन हे नित्यनव्याने

कार्याने यश अपयश पदरी
कार्य घास घाली तो उदरी
कार्य अर्थपूर्णताही देते
कार्य दिगंती कीर्ती नेते

म्हणून सावध सदैव रहावे
कार्य अती निष्ठेने व्हावे
अंतिम कार्य फळेल तेव्हा
कार्यापुढती नतमस्तक व्हावे

कार्य साथीला जन्माआधी
कार्य सोबती मृत्यूनंतर
सृष्टी सारी कार्या तत्पर
कार्यची करणे नित्यनिरंतर

घे कार्याचा ध्यास तू वेड्या
सत्कर्माने खुलतील बेड्या
कार्यावरती कोर आपुले
नाव अलौकिक गंधित पेढ्या

दि. १०/०५/२१
दुपारी ०१.५७ वा.

## (४)
## स्वर

स्वर जन्म सांगतो रडका
स्वर आनंदाचा बरं का
स्वर भावभावनी ओला
स्वर एक हुरहुरी हुंदका

स्वर आर्त कळकळीचा हा
स्वर खोल सखोल दरीचा
स्वर उंच हिमालय कधी तर
स्वर स्वर्गाचा भेदक हा

स्वर पाताळातील गूढ
स्वर दिशा कधी दिंमूढ
स्वर कधी हर्ष आरूढ
स्वर परंपरेचा रूढ

स्वर गाभाऱ्यातील देव
स्वर अंतर्मन अभिभाव
स्वर मूक एक आक्रंदन
स्वर एकलेच हे रुदन

स्वर याचक कधी बिल्कुल
स्वर मायेचा आकुल
स्वर रेशमी स्पर्श दुकूल
स्वर अनुकूल प्रतिकूल

स्वर गंगाजल तीर्थाचा
स्वर स्वार्थ आणि अर्थाचा
स्वर सार्थक होतो कितीदा
स्वर जीवनगौरव गाता

स्वर स्वरात न्हाऊन येतो
स्वर नाद देऊनी जातो
स्वर प्राजक्ताचा गंध
स्वर सुकली बकुळी होतो

मी स्वरा सुस्वरा होते
मी मूक धूसरा होते
मी स्वरात मिसळून जाता
मी स्वर हेमांगी होते

दि. ०३/०५/२१
दुपारी १२.२४ वा.



## (५)
## सुन्न मनाची विषण्ण दारे

अथांग सागर प्रवास इथला
दोन गलबते अशी साथीला
रात पुनवही चांदण वेळा
तेजोहीन परी का हा चांदवा

उगा उदासी पसरून गेली
चेहऱ्यावरती मंद चांदणी
काय जाहले आज ह्या राती
लुप्त चांदण्या बघ आकाशी

पाण्यावरती प्रतिबिंबाच्या
मंद तेजाने लाटा शिणल्या
आणि तरंगी हुरहूर हुरली
सागर वेडा असाच दमला

प्रवास होतो होतंच राही
अंतर काही कटतंच नाही
आतबाहेरी सुन्न विचारी
असे प्रवासी संकट दारी

कुणी ना सोबत तरी गलबते
साथ देऊनी पुढे चालली
अजून काही दिस येई अमावस
दिसामाजी ही उदासी वाढली

कंटाळवाणे वातावरण हे
सुन्न मनाची विषण्ण दारे
आज न वाहून वाहत येती
कुठून अनोळखी विचित्र वारे

असा नकोसा प्रवास जीवन
कधीतरी हे उदास की वन
एकटे आपण समूह असूनही
एकटे जाणे एकटेच मन

दि. ११/०५/२१
सकाळी १०.२९ वा.



## (६)
## काट्याकुट्यातून डोले फूल

काट्याकुट्यातून डोले फूल
मनास पडते क्षणात भूल
परिस्थितीला देऊन हूल
आनंदाने असेच झूल

असे असते मज जर का जीवनी
मीही गेलो असतो प्रगतीतुन
असे नाही ना मनासारखे
परिस्थितीला दूषण आतून

कशास कुढणे नकोच रडणे
काट्यांचे अंथरूण करणे
आज असेल जर हिंमत कळीची
काट्यातूनही सुंदर फुलणे

रंग केवढा चटकदार बघ
पराग हसरे आकर्षक
किती मुलायम शरीर पाकळ्या
रुपडे अति चित्ताकर्षक

असेच फुलवू जीवन आपुले
काट्यांच्याही रुक्ष वनी
बीजामध्ये असेल इच्छा
उमलून जाऊ आधी मनी

वरवरती मग प्रकटित करणे
वास्तव रूप हे गोजिरवाणे
ती काट्यांची पार्श्वभूमी आणि
त्यावर रेशीम फुलवून देणे

नक्की थबकतील रसिक तुझ्याशी
काट्यातूनही फुलल्या फुलाशी
कौतुक शतपट अधिकच होईल
रसिकही निष्ठा तुजवर ठेवील

कुणी पाहो व नच पाहू दे
कौतुक होवो अथवा न होऊ दे
आपल्यासाठी आपण फुलणे
इतके आतून पक्के होऊ दे

दि. १२/०५/२१
सकाळी १०.२३ वा.

## (७)
## कसे सांगू तुला

कसे सांगू तुला
जगण्याचे कसब
विसरून चरे
हसण्याची लकब

चिरणारे हृदय
असे शब्द खुनी
बंबाळ भाव
विराणी मनी

अपमानी घोट
गिळणे जहरा
आपुलाच मान
राखून जरा

गुज जाणती जे
आपुलेच कुणी
भेदिती मर्मा
ते जवळचे कुणी

कधी घात करी
फसवून साथी
कसे सांगू तुला
पडे गुंग मती

तरी हसणे पुन्हा
फुलणेही असे
जगण्यावरती
चैतन्य दिसे

कसे सांगू तुला
किती उमटती वळ
तेच मूकपणे
बघ देतील बळ

दि. १३/०५/२१
सायं ०५.४० वा.



## (८)

## सगळे जीवन जरतारी क्षण

या वेळेच्या कणाकणाची
इतकी सुंदर नक्षी व्हावी
काळ पुढे पुढे सरतानाही
स्मृतीपटलावर साक्षी व्हावी

कधी कुठला क्षण असा पानेरी
कधी फुलांवर स्वार ती स्वारी
कधी सृष्टीच्या मांडीवरती
रेंगाळून क्षण गर्दी करती

कधी तरी सर सरसरसर
निसटून जाती क्षण ते काही
कधी घट्ट पकडून ठेवता
हातून अलगद तरीही सुटती

क्षणभर येती पुढती जाती
सतत पळण्याचा शाप असा
कधी क्षणांना थांबू वाटे
पण पुढे जाण्याचा धाक तसा

चला कोरू या क्षणाक्षणांवर
सुंदर ठसणे बाज असा
आकारही तो असू दे वेगळा
सौंदर्याचा काळ जसा

पुढती जाता खुणा आपुल्या
अंगावरती लेवून तो
क्षण क्षणाला निरखून जाईल
काळ काळावर भाळेल तो

नको ओरखडे दुःखदर्दभरे
क्षण तुटके फुटके काही
नको उसवणे धागे शिवणी
नको नकोसे क्षण काही

येतील त्यांना स्वीकारू आणि
रेखुन टाकू नक्षी छान
क्षणही मोहरेल, दुःखही बहरेल
विणला जाईल शेला महान

सगळे जीवन जरतारी क्षण
आपण विणकर मोदभरे
जाता संपून इथली शिदोरी
मरण गालिचा पूर्ण करे

दि. १६/०५/२१
सायं. ०५.०३ वा.

## (९)
## व्रत दानाचे चालो निरंतर

जमेल तेवढे देऊन टाकू
काही सोबती नेणे नाही
वित्त असो वा ज्ञान मान अन
अन्नधान्यासह आणखी काही

ज्याला ज्याची निकड भासते
हात उदार हा सदा असू दे
नकोच काही ममत्व कोठे
देण्यामध्ये लोभ नसू दे

शब्द कुणाला आधाराचे
मधात घोळून बोलून द्यावे
कधी कुणाच्या सोबत थोडे
असेच सहजी चालून जावे

माझे माझे म्हणतो आपण
देहही सोबत जाणे नाही
प्रेम जयांवर केले निस्सीम
परलोकी कुणी येणे नाही

सृष्टी सारी देत राहते
जे जे सुंदर मंगल आहे
देणाऱ्या दानशूरासाठी
हे जीवन मुक्तांगण आहे

म्हणून जे जे दिले ईश्वरे
देण्यामधुनी समाधान घे
व्रत दानाचे चालो निरंतर
तोही सार्थक पुण्यप्रदाने

दि. २३/०५/२१
रात्री ०९.१३ वा.



## (१०)
## सुगंध दरवळ कस्तुरी शोधणं

चल गं हरणे आसरा घेऊ
तिन्ही सांजेला घरकुल पाहू
दिनभर हिंडून थकला दिनमणी
पाखरंही परतून चाललेत गगनी

घरट्याची ओढ कशी सगळ्यांना
उबदार प्रेमाची घरं ज्यांना
तुझं नि माझं घरकुल राणी
रानात आडोसा डोळ्यात गाणी

पाडस गोंडस खोडकर चंचल
आज जरा उशीर झालाय चल चल
बावरलं असंल, घाबरलं असंल
मायेच्या नजरेनं अलगद उचल

थोडं रेंगाळलो, निवांत चाललो
झाडांच्या आडून आकाशाशी बोललो
उंच झाडाआड, दिनकर पल्याड
एकमेकांवर पुन्हा गं भाळलो

अगं अगं हरणे, एक ध्यानी धरणं
सहजीवन बघ सुखाचं करणं
जाताना एक दिस मावळती नेतो
नव्याच आशेला घेऊन उगवतो

असंच सुंदर असावं जगणं
पाऊलखुणा राणी वनात सोडणं
सुगंध दरवळ कस्तुरी शोधणं
आपल्याच आतलं अमूल्य जाणणं

दि. २४/०५/२१
रात्री १२.१६ वा.

## (११)
## मी साऱ्यांचे गीत लिहिते

दुःखात असताना मी
कोणी खबर ना घेते
ते दुःख लिहिले की मग
वाह वाह ची दाद येते

म्हणतात वेदनाच
प्रसवून देती काव्या
जे भोगले मनाने
शब्दात सांगी गाथा

पण साहतांना दुःख
माझीच असते मीही
शब्दात मांडले की
प्रतिबिंब सारे पाही

इकडे उरात जखमा
भळभळती आर्ततेने
शब्दात मांडल्या की
मैफिल सजून जाते

कवीपण जे सोबतीला
म्हणणे ही सोपे होते
त्या भावना न माझ्या
मी साऱ्यांचे गीत लिहिते

दि. २६/०५/२१
सकाळी ०९.४३ वा.

## (१२)
## जीवन चंदन गंध हे स्पंदन

स्पंदन गर्भातील सुरुवात
नव्या जिवाची नव रुजुवात
सोबती कायम जगण्याचे
लक्षण आपण असण्याचे

गर्भासंगे जन्मे स्पंदन
आईचे हे आंदण स्पंदन
बाळ आईचा दुवाही स्पंदन
जीवन पुस्तक गाथा स्पंदन

स्पंदन वाढती स्पंदन घडती
क्षणाक्षणाला तडपवती
स्पंदन आतून सारे जाणून
घालमेलही ओळखती

स्पंदन राग अनुरागही स्पंदन
मोहलोभ सुखदुःखही स्पंदन
कधी मूक निमुटसे आक्रंदन
कधी कला गुरुजनांसी वंदन

नीती अनीती सीमारेषा
कधी मनातच ते रणकंदन
कधी दबलेल्या किती आकांक्षा
कधी नकोसे ऐसे बंधन

कधी रुग्णालयी भिवविते स्पंदन
कधी नभांगणी नेते स्पंदन
कधी जिवलग मग आरूढ होता
हिंदोळ्यावर झुलते स्पंदन

कधी गीत संगीत हे स्पंदन
कधी खळखळ नदी वाटे स्पंदन
कधी गर्त खोल खोल हे स्पंदन
कधी नात्यांची गुंफण स्पंदन

सारे सारे झेलून दमते
शक्तीहीन मग जेव्हा स्पंदन
संपे इथली यात्रा तेव्हा
शांत विसावे माझे स्पंदन

म्हणून जगते स्पंदन स्पंदन
जीवन चंदन गंध हे स्पंदन
किती एकटी असले तरीही
सोबत करते मजला स्पंदन

दि. ३०/०५/२१
रात्री १०.३९ वा.





## (१३)
## माय शाळेचे सांगणे

ओस पडलेल्या शाळा
गुपचूप भिंती फळा
सारे बाकडे तसेच
वर्गखोल्या ओक्या बोक्या

चिवचिव पाखरांची
आता ऐकू येत नाही
कोणी शाळेच्या अंगणी
आता बागडत नाही

नाही कविता गायन
पाढे रटनेही नाही
चिमण्या लेकरांची गोड
किलबिल कानी नाही

शाळा माय माऊली ही
वाट पाहते घरात
कधी येतील ग बाळं
शिकायला ती भरात

त्यांच्या डब्यांचे गोडवे
वह्या पुस्तकांचा थाट
सारे आठवून माझ्या
डोळ्यातून जलपात

स्वागताला तुमच्या रे
मी उत्सुक आहेच
हाती गुलाब घेऊन
अशी तिष्ठत राहेच

या रे या रे हुंदडत
खिदळत सारे या रे
पुन्हा पहिल्यासारखी
होवो सुरळीतता रे

काही होऊ नये कोणा
सारे सुखरूप रहा
माय शाळेचे सांगणे
ज्ञानवंता दिशा दहा

दि. ३१/०५/२१
दुपारी ०२.४२ वा.

## (१४)
## म्हणून दुःख हे सख्या चांगले

कशास चिंता सुखदुःखाची
नसे चिरंतन काही इथे
रंगभूमीवर निभावण्याला
जमती भूमिका सारे जिथे

हवेहवेसे वाटत असते
सुख केवळ मज मिळणे हे
क्षणात येते लबाड सुख हे
हुलकावणी मग देत असे

झुळूक थोडीशी येते सुखाची
तेच रहावे वाटे सोबती
रमता आपण त्याच्या मध्ये
झडती दुःखाच्या अशा नौबती

सुखही जाईल दुःखही जाईल
मान दुःखाला सख्खा साथी
कुणी आपुले असो नसो वा
दुःख होतसे सच्चा साथी

ते असते मग खरे रूप हे
कळते सगे सोयरे सख्यांचे
ते असते ना तेव्हा आपण
होतो सखे एकाकी स्वतःचे

दुःखामध्ये देव आठवे
रूप तयाचे स्मरती ना
किती असू दे काटे पदतळी
उरात जखमा उरती ना

सोडून साऱ्या चिंता गुंता
कवटाळून घे दुःख आपुले
जाते तरी ना देते दुःखा
म्हणून दुःख हे सख्या चांगले

दि. ०४/०६/२१
सकाळी ०८.५३ वा.

## (१५)
## गठडी ही पूर्वजांची

असतात काही बाबी
निव्वळ परावलंबी
ठेवावी दोर हाती
आपल्याच होत नाही

ठरते तसे न घडते
मध्येच काही अडते
नसतो विचार केला
संकट मधेच पडते

असते अनुभवाची
गठडी ही पूर्वजांची
सांगून शब्द जाती
अनमोल मते त्यांची

येता प्रसंग बाका
माघार घेण्या सांगा
तो काळ सारखा ना
ती वेळ टळते पहा ना

अडला हरी तरी तो
धरी गर्दभाचे पाय
आपण कोण मोठे
नुकसान कोठे काय

दि. ०१/०६/२१
रात्री ०८.३५ वा.

## (१६)
## समर्पण ऐसे अलौकिक

देणे आणिक अर्पणातले
अंतर समजून घ्यावे
हळूहळू मग मनास आपुल्या
समर्पणाकडे न्यावे

देणे काही वस्तू अथवा
लौकिक क्रिया असावी
भाव मनीचे ओतून सोबत
अर्पण क्रिया घडावी

उच्च काही ते उदात्त ऐसे
ध्येय मनातून स्फुरता
अर्पण करण्या काही आपुले
विशेष यत्ने करता

अर्पण जेव्हा सम्यक होईल
खोल त्याग भावना
करता समर्पित समाधान हे
डोंगराएव्हढे पहा ना

जीवन भारावून जाते मग
समर्पणाची धुंदी
देव देश वा कुणी कुणास्तव
करते समर्पण हुंडी

अनूभवावी निज श्रीमंती
समर्पून काही मौलिक
रितेपणातील भरलेपण हे
समर्पण ऐसे अलौकिक

दि. ०७/०६/२१
सकाळी ०८.१४ वा.




(१७)

## आयुष्याचा पट खेळाचा

आयुष्याचा पट खेळाचा
सुख दुःखाचे भरले चौकोन
निव्वळ समजूत असता गड्यांनो
डाव टाकतील प्यादे जरी मौन

हत्ती घोडे वजीर सैनिक
संसारातील श्रीमंती अन
चाल आपली हाणून पडते
प्रतिडावाने खेळे नियती

कधी आपली बुद्धी तल्लख
विजयाचे मग डाव ओंजळी
परी सहज ना सुटतील ऐशा
क्षणोक्षणी पडतील बघ खेळी

सावध असणे सदैव सांगे
खेळ जीवनी खेळा मानून
सुख दुःखाचे कसले डोंगर
ह्यांना अलगद जा ओलांडून

समजून आपुल्याला राजा वा
राणी जाणे काही हुरळून
खेळ वाचवी कधी जगण्याचा
कधी हारणे घ्यावे उमजून

एक क्षणाचा डाव हारता
किंचित थांबून जावे क्षणभर
पुन्हा नव्याने नवे खेळणे
नवेच सारे प्यादे भरभर

नकोच रडणे पडणे खचणे
नव्या उमेदी डाव नव्याने
विचारपूर्वक पाऊल उचला
हेच सांगणे बुद्धिबळाने

खेळ मांडला तोवर ऐटीत
सारे सारे डाव चालती
संपून जाता खेळ येथले
काळसंदुकी होतील बंदी

जरी सारे हे माहीत तरीही
पुन्हा नव्याने खेळावयाचे
रोज वेगळे खेळ मांडुनी
पुढे पुढे मग चालावयाचे
पुढे पुढे मग चालावयाचे

दि. ०८/०६/२१
सकाळी ०८.३१ वा.



## (१८)
## आज कवेत हा चांद

आज कवेत हा चांद
माझी आकाशात स्वारी
तारे नक्षत्रांची इथं
किती मांदियाळी भारी

रंग मनाचा बदले
नभ दिसते वेगळे
थोडे काळे थोडे निळे
थोडे राखाडी जांभळे

पूर्ण कला राकेशाच्या
त्याचं चांदणं भावतं
हात पसरून त्याला
येण्या मनी ते सांगतं

त्याला जवळ पाहता
मीच आकाशाचा होतो
चांदव्याला मग माझ्या
अंगावर खेळवतो

त्याचे नखरे कितीक
कधी कोर ती बारीक
कधी गोल तो सुरेख
कधी अर्धगोल एक

कधी लपतो ढगात
कधी मनाच्या युगात
त्यास जवळून पाहू
काय पडलं डागात

त्याच्या चांदण्याच्या घेऊ
ओंजळीत या चांदण्या
त्याला मनात लपवू
गुज मनाचे सांगण्या

दि. ३१/०५/२०२०
सकाळी ११.३८ वा.

## (१९)
## बालक एक बिचारे

मोजत होते चिल्लर
थोडे तयाजवळचे
फटाक्यांच्या दुकानाशेजारी
बालक एक बिचारे

जाऊन पुन्हा पुन्हा
किंमत विचारी तो की
फुलबाजी तोटे कितीचे
नळे चक्र लड कितीची

मग ऐकुनी तो येई
मोजून घेत राही
अंदाज आपुला थोडा
येईल का यात काही

मुले पालकांकडे ते
करताना हट्ट पाही
कितीही दिले तरी ते
मागतीच काहीबाही

याच्या मनीचे रॉकेट
होते महागडे जे
उडण्या आधीच फुसके
गरिबीने त्यास केले

दीपावलीच्या आधीच
संपून एक गेली
फुलली मनात होती
लक्खं प्रकाश दिवाळी

फुटले मनात त्याच्या
सारे नवे फटाके
नाणे पुन्हा खिशात
दिवाळी मरते मनात

जमेल पुढची दिवाळी
मनास समजावी तो
बालक मेले कधीचे
पोक्त जन्मला त्यात

एक दिवा हा दारिद्र्याचा
मिणमिण प्रकाश होता
लख्खं उजळण्या आधीच तो तर
विझून गेला होता

दि. ०१/११/२०२०
सकाळी ११.५१ वा.

## (२०)
## मी फाडली वही

इच्छा नि आकांक्षांची
काल रात्रीच मी फाडली वही
एका पानावर मात्र
आईबाबा नावं ठेवली तेवढी

साऱ्या कामनांच्या मागे धावून
खरंच आता थकलो आहे
ज्यांच्या स्वप्नात माझ्याच इच्छा
त्यांनाच नव्याने भेटलो आहे

रोज देवासमोर आई दिवा लावते
माझ्या सुखासाठीच त्याला कोड्यात घालते
वडील माझे देवाला अगदी ठणकावतातंच
पुण्य सारे पणाला लावून
खेचून आशीष आणतातंच

मला वाटायचं माझ्या इच्छा
साऱ्या केवळ माझ्याच
माझ्यापेक्षा जास्त त्या तर
मनात राहायच्या या दोघांच्याच

आता ते नसतील तर कोण बरं
प्रेम करेल खुळ्या या भावनांवर
आता मी  पोरका, इच्छा उदास
पूर्ती त्यांची वाऱ्यावर

पुन्हा काही नको मला
आईवडील तेवढे दे
माझ्याकडचे देवा सारे
सारे भले तू काढून घे

एकदाच जवळ जात
कुशीत त्यांच्या सामावून जाईन
इच्छांचे मूर्त रूप
त्या दोघांच्या डोळ्यात पाहून घेईन

दि. २०/११/2020
सायं. ०६.११ वा.




## (२१)
## मन कमळ फुलून यावं

मन कमळ फुलून यावं असं
चित्त सरोवरही नितळसं
शुभ्र स्वच्छ जलाची सुंदरता
शुभ्रदल पंकजे उमलता

नानाविध भावनांची कल्लोळता
शांत कराव्या संयमी लाटा अशा
मग पहावे सूर्यास निरखुनी
अंतःकरण घ्यावे की पारखुनी

आजूबाजूस किती ही हिरवाई
मनी उगाच दुःखाची दुखराई
त्यास चिखल करून तुडविता
वर आनंदकंदाची कमळाई

वाट पाहती कित्येक कळ्या अशा
कधी फुलण्या मिळेल वाव खरा
चित्त लावावे नारायणाच्या पायी
मग विकास साराच देख जरा

लिप्त नकोच संसारजल तनी
राहू त्यातच नको ते तरी मनी
पायी दलदल असू दे कितीतरी
वर मुखकमलाची शोभा भारी

असे उमलून येता आत कमळ
वर कांती झळके ना सकळ
सरोवराच्या विरुद्ध आपुले
चिखल वर तरी आत फुलणे

वरच्या लाटा वरचे पाणी
सारे चिखलही वर फेकणी
आत उमले कमलदल
चित्तसूर्याची अशी करणी

दि. ११/१२/२०२०
सकाळी ०९.४९ वा.



## (२२)
## सूर्य उगवता सोने पसरे

सूर्य उगवता सोने पसरे
मधे उभा नग जात
असे दर्शनाची आस आणिक
छेद तयाच्या आत

तेजपती श्रीनारायणाचे
रुपडे किती मधु बरवे
पण डोंगर हा मधेच आडवा
देहासी पसरवे

आस भेटीची असे केवढी
खडका खोदीयले
व्यत्यय मोडून काढून मग ते
प्रस्तर भेदीयले

असेल ध्येयासाठी मनी ही
जिद्द भावना मोठी
किती संकटे उभी ठाकू दे
अगदी डोंगराएव्हढी

त्यातून मार्गा बनवीत जावे
ध्येय प्रविष्ट की होईल
सोनसोनेरी आशाकिरणे
सूर्य हाताशी येईल

उभे असू दे किती अडथळे
मर्मी घाव बसावा
तेजकिरण मिळविल्या विना ना
जिवास मिळू दे विसावा

असा भेटता मार्ग सोनेरी
कष्ट फळाला येती
नित्य नव्याने संधीपहाट या
किरणे उधळून जाती

दि. १४/१२/२०२०
सकाळी ०८.५४ वा.



## (२३)
## दोन क्षितिजे

दोन क्षितिजे आत बाहेरी
उगवे सूर्याचे बिंब करारी
कोवळे कोवळे किरण येती
मळभ घेऊन जाण्यास दूरी

प्राचीचा सूर्य रोज पाहतो
मनात वाकून काही बोलतो
आतला आत्मसूर्य एकला
आतल्या आत दिशा चालतो

बाहेर सांजा होतात रम्य
आतल्या सांजा करू सुरम्य
दिक्सूर्य तापतो निवतो आणि
चित्सूर्य सदाची आत्मगगनी

मावळतीचा सूर्य थकला
आकाश संचारूनी वाकला
क्षितिजाशी थोडे टेकतो कसा
तशातच भरा येते ही निशा

ग्लानीत सूर्य, चंद्र भरात
चांदण्या भरली नभपरात
रोज रातीला त्यांचा गोंधळ
रोहिणी सवे हा चंद्र मधाळ

मनात सूर्य क्षितिजा आड
चंद्र वाढला बिंब अल्लड
त्याच्या कला कला तेजसकला
चांदण्या अगणित ऐशा उनाड

पुन्हा येतो रोज उगवे रवी
आत बाहेरी चैतन्ये नवी
ठरलेली वेळ प्रभाकरची
आतला उगवे काही न ठावी

आतले क्षितिज विस्तारले की
उगवून पाही नवेच काही
सत्य शिव सुंदराचा तो सूर्य
चंद्र नि किती तारे डोहाळी

तेज आतून पसरू द्यावे
क्षितिजाने मग चिंब भिजावे
कधी या सूर्या कधी चंद्रासी
कवेत आपुल्या भरून घ्यावे

दि. १९/१२/२०२०
सकाळी ०८.१३ वा.



## (२४)
## भावनांच्या रे होड्या

या अशा पावसाळी... पावसाळी...
भावनांच्या रे होड्या
मन बसून त्यातून करीतसे
पावसासंगे लाडिक खोड्या

चिंब ओले घर चिंब झाले दार
साचले पाणी तेथे तळे गारगार
अंगास भिजवून त्या पावसात
ज्या मारल्या आठवा त्या उड्या
त्या पावसाळी भावनांच्या रे होड्या

कधी कागद रंगीत ते मिळावे
कधी वर्तमान पत्र फाडून घ्यावे
किती घाई घाई बनवून नावा
शिरशिरी अंगात स्वप्नाळू थोड्या
त्या पावसाळी भावनांच्या रे होड्या

साऱ्यांनी केल्या नि सोडून दिल्या
वाहत दूर सांगा कोणाच्या गेल्या
मन गेले कोठे होड्यांसवे या
ते रम्य बाल्य खुणावी न वेड्या
त्या पावसाळी भावनांच्या रे होड्या

उगा मोठे झालो नि नियमात गेलो
स्वच्छंद जगणे हरवून आलो
ते थेंब तो गारवा तो ओलावा
मनाची तळी भावना कोरड्या या
त्या पावसाळी भावनांच्या रे होड्या

माणूसपण न कळताच होते
कळले न सारे मनुपण हरवले
या पावसाची दुरूनच भलावण
परतून जाती सरीही सड्या या
त्या पावसाळी भावनांच्या रे होड्या

दि. ११/०२/२१
रात्री ११.४३ वा.



## (२५)
## आज हसले गोकर्ण

आज हसले गोकर्ण निळे ते
खुदकन निळसर गाली
हिरव्या पानांमधे मोरपिशी
प्रभा छान सांडली

आत दुधाळ्या रंगांची
साथ निळ्या वर्णाला
आकाराने चोरीयले की
गाईच्या कर्णाला

आत डोकवे उगाच वेडे
शिवलिंगाची आस
कुणी खुडेल का तोडून मजला
नेई शिवाच्या पास

स्पर्श रेशमी दडते पानी
फूल लाजरे थोडे
गंध न त्याला लौकिक काही
शिवपरिमळ मनी वाढे

वेल कोवळी नाजूक फांद्या
हिंदोळ्यावर कळ्या नि कळ्या
अलगद वारा मारून टिचकी
उमलून देतो फूल पाकळ्या

गालावरती खळी शोभते
फूल लाजते नाजूक फार
रंग माधवाचा हा अंगी
आराध्य हे शिवशंकर स्वार

कुणी पाखरू पाहते फुलांना
मिचमीच डोळे उघडून झाप
फूलंही रमे त्याच्या लाडिक
चाळ्यासंगे उगा अमाप

सृष्टीमध्ये प्रत्येकाचे
दैव वेगळे रूप बहार
कुठल्या फांदीवरी उगवणे
कुठे वाहणे जीव सुमार

तरी हसावे, उमलून यावे
वाऱ्यासंगे झुलून घ्यावे
ऊनपावसासंगे खेळत
शरदालाही अंगी ल्यावे

नकोच रडणे उगाच कुढणे
सुकणे पडणे असो खुशाल
पुन्हा नव्याने मातीमध्ये
रुजून उमलून यावे विशाल

दि. ०२/०१/२०२०
सकाळी ११.५४ वा.



## (२६)
## होती बहार जेव्हा

होती बहार जेव्हा
फुलले मळे कित्येक
अगणित पुष्प फळेही
लगडून ती अनेक

हे रंगरूप माझे
होते तवाणे ताजे
शृंगार हिरवाईचा
गुंजन पक्षी गाजे

ही पल्लवांची कोंबे
मृदु रेशमी तो स्पर्श
अंगास ये शहारा
वासंती हा उत्कर्ष

फांद्या त्या वाकलेल्या
पानाफुलांच्या ओझे
येती दुरून पांथ
विश्राम घेण्या येथे

टेकून बुंध्याशी या
छायेत घे विसावा
देई मी अगदी सर्वा
ही आस हा दिलासा

जाता बहार आता
मी एकलाच येथे
पानेफुलेफळे ना
गेले ते पक्षी कोठे

ना दिसती पांथ येथे
टाळून दूर जाती
दृष्टीही त्यांची विरस
आतून बोचे मजसी

होती बहार जेव्हा
गोकुळ नांदलेले
माझेच श्वास आता
आहेत कोंडलेले

तरी पाहतो स्वतःला
शिशिरातल्या क्षणी या
येईल ऋतू माधव
आतून रस ओला

माझ्या मनात फुलतो
आधी वसंत वेडा
मग अंगाखांद्यावरती
सृष्टीच्या रम्य उड्या

आतून जपणे सारे
वरवरचे गळते जे ही
जीवनरस वाहो
ते आत्मतत्त्व पाही

दि. ०३/०२/२१
सकाळी ११.२१ वा.



## (२७)
## उगा शांत बसलो मी

उगा शांत बसलो मी
काही न बोलू
जिथे नाही किंमत
शब्द वाया न घालू

असावे कुणी
ऐकणारे मनाने
बोलण्याला मिळे मग
धारही त्या प्रेमाने

उगा रानी मी
एकट्याने का गावे
कुणाच्या तरी कानी
स्वर माझे जावे

न दिसती मला हे
जवळचे कोणी माझे
नाही ओळखीचे
नाही पाळखीचे

नसो कोणी परिचित
अपरिचित रसिकही
असो कोणी वेडा
भुलेल जो सहजही

घरी नाही कोणी
हे गीत ऐकणारे
म्हणून रानी आलो
कैफियत सांगण्या रे

ऐका हे झाडांनो
फुलांनो फळांनो
तुम्हासाठी गाईन मी
साऱ्या साऱ्यांनो

असेल कोणीतरी
कदर जो करेल
असेल कोणी मजला
मनाने स्मरेल

अजून एक वाटे
मनाला या माझ्या
का गाऊ नये मी
केवळ साठी माझ्या

कुणी ऐको अथवा
ना ऐको रे कोणी
माझ्याच साठी मी
गाईन गाणी

ना मी उदास
नाही हो निराश
सुकल्या फांदीवर
नव पल्लव प्रकाश

दि. १२/०२/२१
दुपारी १२.४१ वा.



## (२८)
## रंग वेगळे जगून घ्यावे

बघू या म्हटलं रंग पानाचा
अंगावरती अलगद लेऊन
पानासंगे डालीवरती
वाऱ्यासंगे स्वच्छंदी खेळून

किती ही पाने ताजीताजी
पोपटी हिरवी हिरवी
डोळ्यांनाही सृष्टी वाटे
शीतल बरवी बरवी

नेहमीचे मग पक्ष्यांचे ते
रंग नको मज म्हटले
सरळ देवाला अंड्यामधुनी
बोलण्यास गाठले

त्याला म्हणे मी ऐकले होते
मनातून जो बोले
भाव तयाच्या पोचती मनी ही
त्याचप्रमाणे केले

तोही म्हटला बघ रे बाबा
रंग अजब मागशी
पुन्हा बदल जर म्हणशील वेड्या
तैसे होणे नाही

नीट करून तू विचार सांग मज
मी देईन तो वर्ण
तुला हेवा वाटतो ना कैसे
सुंदर दिसते पर्ण

दे दे देवा रंग पानाचा
किती रे तो मनभावन
मीही आगळा दिसे वेगळा
अंगावर मज श्रावण

असो कोणता ऋतू मग आला
मी तर चैतन्याने ओला
शिशिर असो वा ग्रीष्म कोरडा
पाहताच मज मिळे दिलासा

आकाशाच्या निळाईसवे
अन गवताच्या हिरवाईवर
इंद्रधनूच्या सात रंगांनी
रंग माझा बघ खुले वरचेवर

मी झालो हा सखा पानांचा
तेही सांगती गूज मनीचे
कोणी म्हणती आहे अनुपम
पानपक्ष्याचे दृश्य वनीचे

पानपक्षी हे नाव मिळाले
पानांसारखा आल्हादी मी
नवपल्लव गाली लावावी
तसा मऊ अन उत्साही मी

जरा वेगळे रंग असावे
त्याने दिले वा आपणच घ्यावे
त्याच त्याच त्या रटाळतेतून
रंग वेगळे जगून घ्यावे

दि. १७/०२/२१
सकाळी ०७.२२ वा.



## (२९)
## रंग छटुल्या

हिरव्या पिवळ्या लाल पांढऱ्या
किती सुंदर या रंग छटुल्या
शेपटी चोचीमध्ये काळसर
डोळ्यांमध्ये रंग पसरला

परी मी नाही हा खुशीत काही
असाच बसलो उदास थोडा
रंग मनाचे उडून गेले
घरटे कधीचे मोडून गेले

किती जोराचा वादळवारा
कवेत घेऊन गेला पसारा
घरटे तुटले विखरून चारा
असा बसलो मी जणू बिचारा

पुन्हा जमविणे काडीकाडी
पुन्हा कष्टाची बांधून माडी
झाडावरल्या फांदीवरती
विश्व टांगूनी त्यातच गोडी

झाड तरी कुठे कायम राहील
कुऱ्हाड त्यावरती ही चालेल
तरी मी घरटे बनवीत असतो
झाडासवे जीव रमवत असतो

आपण केलेले सारे जे
कमावलेले गमावले ना
रंग सारे मग फिकेच पडतील
आपुलेही आपुल्याला नडतील

पुन्हा एकटे पुढे चालणे
गवतकांड्या या गोळा करणे
चोचीने गुंतवून प्राणा
पुन्हा नव्याने छत बांधणे

उडणे रमणे बसणे पाहणे
दाणापाणी चोचीत भरणे
यापेक्षाही उंच भरारी
मनात पंखातूनही भरणे

आतून रंग उदास हा माझा
वरल्या रंगाचा हा दंगा
पण मी आता फुलवीन स्वतः
रंग नव्याने भरीन स्वतः

दिसेल मग हा पक्षी तुम्हा
आनंदाने विभोर झाला
आकाशाच्या उंच मर्यादा
निज विश्वासे लंघून आला

कितीही जावो उंच उडूनी
भराऱ्यातंही ओढ मातीची
पाय टेकवून घरट्यामध्ये
दाणे पुरवतील आस चोचीची

पंचप्राणांचे पंचरंग हे
शरीरावरती खुलून येतील
जेंव्हा आतल्या पाचजणांवर
आत्मरंग मज भुलून येतील

दि. २२/०२/२१
दुपारी ३.३२ वा.



## (३०)
## फुलून मोगरा

फुलून मोगरा सांगत आहे
ऋतू आला हा आला बहरा
ग्रीष्म सुरू हा होईल आणिक
वसंत येईल गोड साजरा

गंध मोहना घेत जीवनी
तप्त उन्हाळा सुसह्य होईल
कुणी कुठे जरी ताप देतसे
हाच मोगरा धावत येईल

रेंगाळून जाईल जीव हा
मन सुगंधित शीतल होईल
अंगणातला एक मोगरा
जगण्यासाठी अविचल होईल

कळी उगवता पहिलीवहिली
वारा पुलकित होऊन वाहील
आता पुन्हा हा परिमळ वाहून
ऋतुसवे तो धन्य गं होईल

एक कळी मज कानी बोले
मी फुलण्याला आले आले
फूल झाले की देवापायी
अन गजऱ्यातून खुलून गेले

कधी ओंजळीमध्ये नुसतेच
फुलं मोगरा भरून घ्यावे
अतुल्य ऐशा सुगंध राशी
कौतुकाने मग पहात रहावे

कधी आठवणी करुनी सुरभित
जन्मभराच्या आशा व्हाव्या
कधी मोगरा शोधत जाता
गंधाळून या दिशाच याव्या

आज उगवला पुन्हा मोगरा
तनमन अंगण फुलून आले
फुल उमलता रोपट्यावरी
भाव मनीचे खुलून आले

आला प्रियवर राजस गोंडस
प्रीतीचे ते अनुनय सालस
मीच जाहले गोड मोगरी
सुगंध भरले किती निरालस

दि. ०४/०३/२१
सकाळी ११.३७ वा.



## (३१)
## रंग तबकडी नभ

निळ्या हिरव्या पिवळ्या
साऱ्या छटा मिसळल्या
रंग तबकडी नभ
चित्रकारे घुसळल्या

एक फटकारा ओढी
कुंचल्यातून आपुल्या
चित्र रोज मुक्त होई
देत प्रकाश सावल्या

नभ पिवळे धम्मक
डोंगराला नील कांती
हिरवी गडद झाडेही
तृण पोपटी पोपटी

पुष्कराज नभांगणी
राशी नीलम डोंगरी
पाचू हिरवे हिरवे
वृक्षांवरी भुईवरी

कधी वाटते वाटते
आकाशाला दुलईत
पितांबरी पांघरून
पहा झोपलेले इथं

पहाडांनी निळीशार
जाड कंबळ ओढली
अंग जाडं भरडं हे
आत भरली हुडहुडी

झालं वेली ताजी झाली
रंग तवाना अंगाला
हिरव्या रंगाच्या कुपीचा
नाही तुटवडा त्याला

थोडा फिका केला तोच
गवताला फासलेला
रंग देत थंड थंड
पायी राजाही चालावा

दिनमणी उगवता
मावळतीलाही रंग
केशराचे पिंप भरे
सारा रंगांचाच संग

रंग कळतील कारे
रंग प्यारे आणि न्यारे
काही नजरेत येती
काही आतून पसारे

मोरपिसारे पिसारे
रंग फुलातून द्या रे
रंगारंग जीवनाला
रंग भरून करा रे

दि. ०५/०३/२१
रात्री १०.१० वा.




## (३२)
## केवळ शिवास हृदयी

शोधीत होते स्वास्थ्य
लाभेल का मनाला
माहीत नव्हते यातून
शिव लाभतो कुणाला

तो लाभला भला जो
शिव सत्य सुंदराहे
अन सुंदराची चरिते
मन माझे मंदिराहे

दाबून दुःख होते
मी ठेवले कधीचे
माणूस शोषणारा
शिव पोसणारा आहे

ते आवरण चुकीचे
माया तिचे ते जाळे
मोहात अडकुनी मी
जन्मास व्यर्थ केले

हा अर्थ लाभला मज
शिव काळजात आला
एका क्षणात जटिल
पडदा सरून गेला

ही लाभे शांती मजला
आता स्मशानी देखील
शिव नांदता मनात
शल्य कसे बोचतील

नमने नि जपता त्याला
श्वासागणिक नाम
सारे समर्पिले मी
तो एक नित्यधाम

आता मिळावी कितीही
फकिरास सारी दुःखे
झोळीत विरक्तीच्या
येवोत किंवा सुखे

दोन्हींच्या पलीकडले
जगणे करून घ्यावे
केवळ शिवास हृदयी
कवटाळुनी ते घ्यावे

डबडबले नेत्र दोन्ही
पुसणार नाही कोणी
आतून शिव माझा
आता नकोच कोणी

या बांधनातुनी हे
अलगदसे सोडवावे
मुक्तीचे दान शंभो
बस तूच तेही द्यावे

छळले जीवास ज्याने
ने दूर दूर त्याला
केवळ वसू दे आता
आत्म्यात शंकराला

शिव जीव एक व्हावा
ना भेदाभेद राही
सोऽहम् शिवोऽहमस्मि
ना जाणणेही काही

दि. २५/०२/२१
रात्री ११.२१ वा.




**(३३)**
**असे हसावे मनमोकळे**

असे हसावे मनमोकळे
असे निरागस फुलून यावे
असेच अलगद झोकून देऊन
असे वाऱ्यावर झुलून घ्यावे

असे कळ्यांना चित्र दाखवत
द्यावी प्रेरणा उमलावयाला
जेव्हा फुलणे पूर्णपणे मग
अंगी भिनवू या जगण्याला

रंग कोणता अधिक गडद नसो
मग यशाचा अभिमानाचा
फिक्या असाव्या छटा या सगळ्या
मंत्र ध्यानी ठेवू सुकण्याचा

अल्पकाळ हे टिकते सारे
कशास हुरळून जावे क्षणभर
सौंदर्याची टिमकी नको ना
नको गर्व हा मनात घरभर

हास्य असे ना असते शाश्वत
दुःख किनारी त्याचे गलबत
दुःख तरी बघ कुठे निरंतर
हर्षसागरी नावा झुलवत

जे जे आहे नाही आपुले
कुणीतरी तो महान दाता
कृतज्ञ राहून पळापळाला
श्रेय त्याचे ते त्याला देता

आपण केवळ आलो येथे
आनंदाची बाग फुलावी
सुकून मातीमध्ये गळुनी
काया पुन्हा ही मृन्मयी व्हावी

या मातीला गंध मिळावा
सत्कर्माच्या अत्तरकुपीचा
तिच्या कणातून पुन्हा झरावा
शीतल गंधित असा गारवा

पुन्हा बिजाचे अंकुर व्हावे
एक रोपटे भरभर वाढे
हळूच डोकवी कळी ही कवळी
पुन्हा फुलांचे पडू दे सडे

चक्र सुरेख नि नियत हे असते
कधी खाली ते वरंही जाते
वरचे खाली येतांना मग
उगा खंत का मनी वाटते

उसळून येईल पुन्हा दिमाखे
ऋतुराजाला अंगी घेईल
पुन्हा एकदा फक्त फुलावे
क्षणात जगणे सुंदर होईल

दि. ०७/०३/२१
सकाळी ११.४७ वा.



## (३४)
## कुणी कुणाला घाबरण्याचे

कुणी कुणाला घाबरण्याचे
दिवस गेले रे मित्रा
मैत्री करूनी सोबत चालू
नको वैराचा बघ खतरा

मी तुला यावे कमी कधीतरी
तूही मजला द्यावीस साथ
एकमेकांना नकोच हानी
हाती देऊ चल आपुला हात

आज न मिळते दुधदुभते हे
तू राहशी किती सांग उपाशी
देऊ का मी आणून थोडे
चीज बटर तू खा पावाशी

मजला सुद्धा घरात काही
मिळतच नाही सहजासहजी
करण्या पदार्था काढले की मग
हळूच पळवतो मीही काही

तरी ते चिमटे जीवघेणे बघ
कधी जीवावर बेतू शकते
भूक मोठी पण होते त्याहून
संकट झेलून घेऊन जाते

आता सगळे डबेबंद आणि
डबे कपटी बंद मनासम
मन उदार न आता माणसी
तेही झाले कारागृहासम

दुधदुभते बघ फ्रीज कपाटी
अजून काय हा मानव कपटी
पाळत नाही माणुसकी तो
धावत राहतो स्वार्थापोटी

आता आपल्या जगण्यासाठी
आपणंच ही एकी करणे
मांजरउंदीर सखेसोबती
उदरनिर्वाह मिळून हा करणे

कसला विचार रे करशील आता
नाही काही हाती उरले
हसून खेळून सुरुवात करू
जगणे सुंदरतेने भरले

दि. १३/०२/२१
सकाळी ११.५९ वा.



## (३५)
## अंगणातील ही अबोली

अंगणातल्या अबोलीनेही
अबोली रंग टाकला
जराजरासी होत वेगळी
रंग सोनेरी माखला

ही अबोली बघ वेडी
वेगळी किती जाहली
थोडे बदलून गे स्वतःला
मोद रंगी नाहली

कोणा वाटली आज मोकळी
झाली ती किती बोलकी
दाद तुम्ही द्या रसिकहो
खुडावी हलकी हलकी

ती किती नाजूक सांगू
धाग्याने गुंफू नका
दोराही अलगद बोचतो तिज
सुईची टोचणी हवीच का

प्रेम देता अंगुलीने
सहज गुंतवू या तिला
तीही अडकून होई गजरा
गुंफुनी माळू तिला

तो जुना देई झुगारून
रंग एकंच बंध जो
अन नव्या रंगात पाहते
वेगळा जो ढंग तो

अंगणातील ही अबोली
आज खुलली हो किती
नाही शंका नाही हुरहूर
नाही कसली तिज भिती

आज झाली मोकळी ती
श्वास घेता मोकळे
रंग एकंच बंधनांचा
आज गंधही आगळे

दि. २८/०२/२१
रात्री १०.२३ वा.



## (३६)
## सुंदरतेला ना मर्यादा

सुंदरतेला ना मर्यादा
कल्पनाही कधी नसते शक्य
भूमीगत कांद्याचा फुलोरा
इतुका सुंदर असते शक्य

रुपावरूनी कधी गुणांची
कधी गुणांनी रुपाचीही
केली कल्पना पूर्ण भिन्नते
अनोखे दर्शन असेच घडते

त्याच्या कल्पना अनंत आदि
आपुले जीवन किती प्रमादी
जे कळते ते बिंदू एवढे
भ्रमता मात्र सागरा एवढी

पहा फुलुनी हा आला फुलांचा
अनुपम सुंदर डोल पिसारा
समानता ना कांद्यासंगे
परी कांद्याचा सूचक सारा

आपुल्यामध्ये असतो ऐसा
दडलेला लपलेला गुच्छ
त्याला फुलण्यासाठी मात्र
द्यावा मनोतल अगदी स्वच्छ

डवरून येऊन डोलू लागता
आनंदाला नुरेल सीमा
पाहुनी आपुल्या गुणगुल्माला
देहवृक्षही मोद तराना

रूप आपुले दिसे वेगळे
मग फळांचा घ्यावा भोगही
जरा वेगळे फुलून येऊन
सार्थक येथील जगणे जगही

दि. १०/०३/२१
सकाळी ०९.०२ वा.



## (३७)
## सोनचाफी अभिलाषा

अशी फुले पाहून मनाला
येतो अवेळी बहार
उगा ऐकू ये कोकीळ कूजन
राग वसंत विहार

चाफ्यामध्ये किती वैविध्य
सोनचाफा सुरंग
दिसणे नसते तितके अमूल्य
मौलिक कर्मसुगंध

गंध दरवळे मंदमंदसा
नाजूक देह तलम
उंच वृक्ष कणखर केवढा
सुमन कोवळे मन

एक जरी हा हाती आला
जगणे होई सोने
सहज सुंदर सुरभित तनमन
गंधाळेल हे गाणे

किती आठवणी या चाफ्याशी
पिंगा घालून फिरती
स्थान सदैव असते याचे
सोज्वळतेमधे वरती

शांत अबोलसा धीरगंभीरही
उतावीळ तो नाही
जेही बोलतो हळुवार अलगद
मोरपिसारा काही

मूकपणाने सांगून जातो
सौंदर्याची भाषा
जन्मोजन्मी प्रीतफुला या
सोनचाफी अभिलाषा

दि. १८/०३/२१
सकाळी १०.४६ वा.

## (३८)
## **आधी उल्हास त्यात फाल्गुन मास**

मुळात आळस स्वभाव ज्यांचा
काम टाळण्याचीच ही आस
मिळते कारण सहजी तयातंच
आधी उल्हास त्यात फाल्गुन मास

कुठून कुठूनसे चित्र विचित्र
कामचोरीचे होती भास
कुणीतरी ते काम उरकते
आधी उल्हास त्यात फाल्गुन मास

टाळंटाळ शिकण्याची करतो
नको वाटतो विद्याभ्यास
त्यातंच रद्द होती परीक्षा
आधी उल्हास त्यात फाल्गुन मास

कामावरती जाण्यासाठी
फुका सुट्टीचे होती भास
वरिष्ठ मर्जी होऊन राजी
आधी उल्हास त्यात फाल्गुन मास

घर कार्याची जिम्मेदारी
पार पाडणे काही बास
त्यातंच म्हणते राहू दे कोणी
आधी उल्हास त्यात फाल्गुन मास

अशा माणसा कसे सांगावे
काम कोणते काही खास
खात्री नसते कुणी उपटते
आधी उल्हास त्यात फाल्गुन मास

दि. २४/०३/२१
सकाळी १०.११ वा.

## (३९)
## आर्त व्याकुळ हाक माझी

आर्त व्याकुळ हाक माझी
तुज हृदयी पोचेल ना
भाव मनीचे, शब्द नसता
सारे सांगून जातील ना

का कशी कोणास ठाऊक
आर्तता निपजे मनी
दुःख वेडे वाहते ना
आर्ततेच्या जड पखाली

आर्तता जन्मास येते
आतल्या दुखऱ्या खुणा
हाक ऐशी फुटते आतून
सांगणे जे व्यर्थ कोणा

माय ना दिसताच डोळा
वासरू भटके जरा
संकटाची चाहूल
आर्त हंबरडा खरा

दिसतो मृत्यू क्षणीच एका
वाटते संपलेच सारे
वाचविण्या जीवास आतून
आर्तता ऐसी पुकारे

घेरती कोल्हे लबाड न
संकटांचे टोळ ही
धाड येते धाडकन अन
नाती सारी फोल ही

मिटता डोळे तू दिसे
मग आर्तता तुजसाठी ही
तूच तारणहार हा
विश्वास वसतो की मनी

दूर करण्या आर्तता
कोणी समर्थ नसतो दुजा
विश्व सारे कः पदार्थ
तुजविना जो तो खुजा

आर्त ही किंकाळी माझी
मूक असते कैकदा
ऐक रे तू नाथ माझा
ऐक मजसी एकदा

दि.२९/०३/२१
सायं. ०७.१३ वा.

## (४०)
## **होत काजवा जीवनी**

रानावनात पेटलं
लख्ख काजव्यांचं दिवं
माझं सपान सजलं
लुकलूक ते पहावं

रान झालं की जीवन
राती भयाण अंधार
आस गडद काळोखी
तेज चमकतं फार

सुर्व्या दिसाचा सोबती
काय अमावस राती
चांदवा ह्यो तवा गुल
कुठं चांदण्या बी जाती

कुट्ट काळ्या अंधारात
कित्ती भयाण ही भीती
काहिबाही मनी येता
उरी धडधड व्हती

उडं थवा काजव्यांचा
टिमटिमत्या पणत्या
इवला इवलासा जीव
तेजशलाका कोणत्या

कित्ती आधार वाटतो
काजव्यांचा तुम्हा सांगू
ऱ्हाय एकली रानात
भीती झाडावर टांगू

जवा होतोया अंधार
काळाकुट्ट भवताली
सजना रं तुझ्यासाठी
म्या... काजव्यांची साडी ल्याली

तुझ्या नशिबाला म्या ही
देत राहीन उजेड
होत काजवा जीवनी
तुझ्या काळज्या बिमोड

दि. १२/०४/२१
दुपारी १२.२३ वा.



## (४१)
## फुलपाखरू होऊन

रंग केशरी फुलाशी
फुलपाखरू बिलगे
छटा जांभळ्या सुरेख
नक्षी अजोड त्याची रे

रूप देखणं लाभलं
रंग कित्ती ते साजिरे
मन फुलपाखराच्या
आत वाकते गोजिरे

त्याला परागी व्यसन
आत मधु प्याले पितो
रिचवून मधूघट
झिंग पंखात आणतो

त्याला व्यसनाची खोडी
गोड मधुकण जोडी
अलवार हळुवार
फुलासंगे लाडीगोडी

अशा जीवन फुलाला
फुलपाखरू होऊन
रस प्राशन करावा
धुंद जगण्या पाहून

दि. १२/०४/२१
दुपारी ०१.११ वा.



## (४२)
## मनी सणाचा गोडवा

जीव इवला इवला
जीव कोवळा कोवळा
अंकुरल्या बीजातून
कोंब ताजा डोकावला

त्याची नाजूकशी पाती
डोळे घट्ट झाकलेली
नवं जग दडलेली
वर रूपाची नवेली

आली ताकद कुठून
जीव अणु एवढाच
दव अंगी झेललेला
त्याच्या जिवा एवढाच

अशी शक्ती आत आहे
झाड सामावून जाये
मोती जगण्यातले हे
दव समजून घ्यावे

व्हावे चिंब ओले त्यात
प्रीत प्रेरणा ही आत
भरू विश्वास इतुका
करू संकटी या मात

नवे वर्ष नवा जन्म
नवे रूप नवे स्वप्नं
पुन्हा नव्याने कोवळ्या
राहू पातीमध्ये दंग

नवे अंकुर फुटू दे
मनी सणाचा गोडवा
सारे ऐश्वर्य दवाचे
तुम्हा देऊ दे पाडवा

दि. १३/०४/२१
सकाळी ११.२१ वा.
वर्षप्रतिपदा, गुढी पाडवा

## (४३)
## एक नवाच प्रवास

तुझी मायेची ती हाक
माय देतीया सुवास
बाप नातं जोडलेलं
एक नवाच प्रवास

लेक हक्क सांगतीया
कधी कवा बी बोलावं
काळजाचं हे कवाड
बिनदिक्कत खोलावं

नातीगोती रगताची
सारी कुठं अस्त्यात
कुणी भेटून होतंया
आपलंच रस्त्यात

आपसुक पाझरती
माया नदीवानी व्हाती
जवा मायेची माणसं
गाणं सुखासाठी गाती

एक जनम देतोया
त्याची माया सागराची
एक गुरुवानी बाप
साथ त्याची आधाराची

ल्येक जागली पुनांदा
जीव भरून आलाया
आज नातं जडलंया
बापा पुना फुलवाया

शिरी ऱ्हाऊ दे रं हात
तुझा आशीष मिळावा
मन पावन असं की
सारा थकवा गळावा

दि. १३/०४ २१
रात्री १२.११ वा.
गुढी पाडवा

## (४४)
## नसतेस घरी तू आता जेव्हा

काय होते मज समजत नाही
काही काही ते सुचतच नाही
कधी एकदा पाहीन तुजला
कुशीत दौडत येईन आई

त्या मायेला बिलगून जेव्हा
तुझ्या कडेवर हक्कच माझा
कधी तू उचलून कुणास घेता
जीव खळबळे वरखाली होता

तू कोणाची नाहीस आई
तू केवळ अन केवळ माझी
हाक दिली मी धावत येशी
काळजीत मज सदैव झुरशी

किती विसंबून राहीन मीही
उठता निजता तूच जवळीही
घास तुझ्या हाताने भरवून
पोषण केले वेळोवेळी

दूध बालपणी तुझे मी प्यालो
अमृत जगण्या भिनवुन गेलो
असे अनंत तुझे उपकार
ते प्रेम तुझे गे अपरंपार

तू असता सारे भरलेले
आता न काही बघ उरलेले
जिवापाड ती प्रेमळ माया
वात्सल्याचे झरे नुरलेले

आता एकटा असतो आतून
अमूल्य माया मिळेल कोठून
मी मोठा जरी झालो आई
तुझ्याविना हुंदकेच साठून

जरा कुठे तू जायची बाहेर
जिवात जीव हा राहत नव्हता
तू गेली कायमची आता
उदास वारे घर न बोलता

ते निखळ प्रेम ती तशी वत्सलता
रोमरोमी ती तव कोमलता
झालो दरिद्री कायमचा मी
त्या आपुलकीस पारखा आता

चैतन्याची लाट सळसळे
नदी मायेची असतेस तेव्हा
आटून गेले प्रवाह सारे
नसतेस घरी तू आता जेव्हा

दि. १५/०४/२१
सकाळी ०९.०३ वा.

## (४५)
## कवडसा

घरे बंद ही छतेही बंद
सिमेंटची पक्की पाबंद
जरा इवलुसा असा झरोका
नाही येईल कुठून कवडसा

ते छत होते मैत्रीपूर्ण
काट्याकुट्यांचे लाकडी जीर्ण
तरी त्यातुनी रोज सकाळी
डोकवून जातसंत ती किरणं

अशा प्रकाशा दोरीसंगे
लटकून गेले रम्य बालपण
धुळीकणांना पकडत होतो
लहान मोठे सारे आपण

अंधाराच्या छाताडावर
नाचून जाई रोज कवडसा
त्याच्या येण्यासवे आशेचा
एक किरणंही सापडलेला

खेळ चालले भू सूर्याचे
तो येई फट छोटी सांधून
घर साधे अन मनही मोकळे
गेले आता मनही बांधून

आता न येतो सूर्य अंगणी
घरात त्याला प्रवेश नाही
नाही किरणे तेजंही नाही
कुठे कवडसे गेले पाही

चला घरांना आणि छतांना
ठेऊ मोकळे थोड्या सांदी
मनास करूया पुन्हा खुले अन
लुटून घ्यावी कवडसी चांदणी

पुन्हा मोजूया कण धुळीचे
मनास करूया स्वच्छ चांगले
पुन्हा जगाया सोडू मोकळे
पहा कवडशा झुले बांधले

दि. १९/०४/२१
दुपारी १२.४५ वा.



## (४६)
## चित्रस्वर हे रंगती

भास हे आभास सुंदर
सावल्यांच्या बंदिशी
तो अडकतो दिनमणीही
स्वेच्छेने जणू त्या निशी

संध्यासमयी परत निघता
कोणी वाजवली गिटार
छेडिली अन काळजाची
कोणी प्रीतीने ही तार

हाती ना येतो कधी हा
दिड.मणी सदा व्यस्तसा
आज झाला बंदीवासी
समय जरी तो अस्ताचा

वृक्षराजी जलतीरावर
सावल्यांची सोबत
झडती सप्तही सूर येथे
संध्याकालीन नौबत

क्षितिजंही उतरून आले
मध्यभागी मैफिल
सूर्य अतिथी या सभेचा
कोणी नाही गाफिल

ऐकुनी ते गाण सुंदर
रेंगाळे थोडी निशा
चांदवाही थबकला की
विसरला स्थाना दिशा

जलतरंगांनी दिलेली
साथ सोबत एरवी
छान झाली सांगताही
सूर्य गायी भैरवी

जादू ही संगीत ऐशी
सारे विसरून दंगती
अन निसर्गातून दिगंती
चित्रस्वर हे रंगती

दि. २०/०४/२१
सकाळी ०८.१४ वा.




## (४७)
## पिंपळ पानी मन उतरावे

एका पिंपळपानाचे
रंग किती अलवार
जणू कोवलाई ही झाली
अलगद त्यावर स्वार

रंग केशरी पिवळे पोपटी
काही वाढती काही धाकुटी
काही लाल तांबडे रांगडे
काही बदामी काही लांबडे

हिरवट पिवळे सोनकोवळे
काही गुलाबी अतरंगी
नक्षी सारखी कोरून झाली
तीही भासते सतरंगी

देठ कोवळे शेंडे नाजूक
वास नवा नवलाई साजूक
स्पर्श तलम रेशमी मल्मली
पिंपळपाने गर्दी केली

काय सांगती कवळी पाने
मनास ठेवा तलम कोवळे
नका जरठ त्या होऊ द्यावे
रंग मनाचे फुलतील सारे

पिंपळ पानी मन उतरावे
भाववर्ण ते खुलून यावे
आधाराचा तरुवर ज्ञानी
अतरंगांची शोभा मोहे

जरठ राठ मन होऊ न द्यावे
रंग त्यावरी मचकट सारे
अंतरंग जपताच कोवळे
मनात सारे जपता येते

दि. १८/०४/२१
रात्री १२.२१ वा.



## (४८)
## मुक्त गगनी दे भरारी

सरोवरातील अगणित कमळे
एक अमूल्यही त्याते
निसर्ग आणिक मानव यांचे
सुंदर कोमल नाते

पोटासाठी कळी कोवळी
बाल्य भटकते जेव्हा
हाती त्याच्या कमळफुलांनी
लक्ष्मी दाविली तेव्हा

कमलासनी श्री लक्ष्मी विराजित
विष्णू जणू पहुडले
शांत निवांतसी निकोप निद्रा
वैकुंठ द्वार उघडले

फुले ती सुंदर की ते बालक
कसे हे सांगा घडावे
निर्धन म्हणू की खरा धनी त्या
मन कोड्यामधे पडावे

अशी सुखाची झोप लागली
शय्या सुंदर कमळी
खळगी भरते पोटाची त्या
गट्टी फुलांशी जमली

फुले असो वा मुले ही सुंदर
रचना त्याची अलौकिक
हाती येऊ दे सहजी फुले पण
उदर भार ना लौकिक

मैत्र जुळू दे जुळू दे यारी
बालपणीची सारी
नको डंख रे परिस्थितीचे
मुक्त गगनी दे भरारी

दि. २५/०५/२०२२
सायं. ०५.४३ वा.

## (४९)
## नभ मोकळे झालेले

आत भरून साचले
किती दिसांचे वाफारे
आधी हलके वाटती
पुन्हा जड ते झालेले

एक अवस्था आधीची
मग जलथेंब होती
ओझे मनात वाढते
चाल मंदाऊन जाती

तो तो ढग बने एक
आत गढूळ प्रकाश
वाढतंच चाललेली
गर्दी मेघांची तशात

कोणी अडवण्या येई
दुःख डोंगर विशाल
वारा उडवण्या पाही
आत हजारो शकलं

ऋतू यावा लागतो ना
ढग गाभुळण्या आले
कुणी भेटता आपुला
नभ मोकळे झालेले

दि. २२/०४/२१
दुपारी १२.२३ वा.




**(५०)**

**हासलेले मोती वेच**

अस्सं अंगण अंगण
मन घालतं रिंगण
ऋतू ओघळत येती
त्यांचं चैतन्य सांगणं

सारी हिरवाई नांदं
पाचू भरलेलं झाड
हिरवा चुडाही हातात
शेत हिरवंच ग्वाड

आली नेसून लुगडं
हिरवं इरकल बघ
चोळी अंगावर शोभं
रूप सालस ते तिचं

तिचा वावर घरात
अंगणात खुशी पडं
असं संसाराचं सुख
हाती सोनुली बागडं

छकुलीनं घातलेलं
देख परकर पोलकं
साध्या सुध्या संस्कृतीचं
चित्र किती हे बोलकं

ओसंडून वाहतीया
खुशी मुखड्यावरून
जिथं मायलेकी खुश
घ्यावा आनंद जाणून

हासलेले मोती वेच
कळ्या सुखाच्या अमाप
पायघड्या सृष्टी संग
ये ना अशीच चालंत

असं फुलतं ऱ्हाऊ दे
माझं घर नि अंगण
भर उन्हात पडू दे
माझ्या अंगी हे चांदणं

दि. २२/०४/२१
रात्री ११.४७ वा.



## (५१)
## नाते तिचे नि माझे

नाते तिचे नि माझे
वात्सल्यरूप होते
ती प्रेम शरीरधारी
शब्दात सांगू कैसे

त्या वेदना सहूनी
ती माय रूप लेते
श्वासास ती जिव्हाळा
आयुष्य देत राहते

मज पहिल्या पावलाला
वाकून साथ देई
झिजते तनु तरीही
शिकवत सारे राही

ते बोल बोबडेही
कौतुक तिज साठी
पडले नि झडले मी तर
जखमा तिच्या उराशी

ती जन्मते नव्याने
ती सान होत जाते
माझ्यासवेच तीही
जगणे जगून घेते

मी ऐकणार आहे
जे शब्द तिच्या ओठी
मी मूर्त आज होईन
आधार तिच्यासाठी

नाते तिचे नि माझे
जरतारी मऊ दुशाली
हृदयास लावताना
ती मूर्त माय झाली

दि. २७/०४/२१
सकाळी ०९.११ वा.

## (५२)
## पुस्तकांची कांती ही

पुस्तकांनी वेधले मज
वेड दिधले गोड हे
काळ बांधून ठेवला नि
साधले किती बांध हे

ज्ञान झाले शब्द व्याले
अर्थ आभूषण तया
खोल दडले नाते जडले
करिती पोषण सर्वथा

बालपण रमले तयातुन
वय किशोरही दंगले
रंगले तारुण्य यातून
वृद्धपणही भंगले

भाव सारे उमटले अन
तत्त्व सारे पटले हे
पुस्तकांची साथ मिळता
दुःख सारे मिटले हे

केली परिभाषा सुखाची
रम्यता एकांती ही
एकटी ना कधीच मी तर
पुस्तकांची कांती ही

निजता उठता अन प्रवासी
सोबतीला पुस्तके
ग्रंथ काही मोठमोठे
नमवू पुढती मस्तके

विश्वाचा आलेख यांनी
रेखिलेला आशये
नवरसांची मांदियाळी
भाव सारे बोलके

काही ना दे मज सख्या तू
पुस्तकांची ओढ दे
मी गढून जाता तयातच
पुस्तकांनी ओढ रे

दि. २३/०४/२१
दुपारी ०२.०९ वा.
जागतिक पुस्तक दिनानिमित्त

## (५३)
## कवाड

माझ्या मनाच्या कुटीला
न्हाई कवाड लावलं
येणं जाणं आपुलकी
सारं मोकळंढाकळं

ज्ञानदेवानं कवाड
रुसून की लावलेलं
झाले ताटीचे अभंग
केलं मुक्ताईनं खुलं

आजबी तरास तसा
ज्ञाना समाधीत जाय
न्हाई जागवण्या मुक्ता
झाला निवृत्त सोपान

मंग ठरवलं म्या बी
कुंडी कुलूप ना लावू
सारी झंझट काढून
नको कवाडंच लावू

राग लोभ नको मोह
अभिमान शिवू नगा
माझ्या झोपडीत बसा
नगा तरास देऊ उगा

जसे आला जावा तुम्ही
परतून की माघारी
माझ्या मनामंदी न्हाई
माझा सावळा श्रीहरी

आता जागा न्हाई कुणा
यावं बनून पाव्हणा
न्हाय कवाड अडसर
सत्त्व भाव ठवी मना

त्याच्या आपुल्या मंदी हा
नगं कवाडाचा खेळ
न्हाय बसायाचा मग
सावळ्याशी कवा मेळ

असं भक्तीचं कवाड
ठेवू सताड उघडं
सुखदुःख त्याच्या पायी
जिवाशिवाची सांगड

दि. ३०/०४/२१
सकाळी ११.०० वा.



## (५४)
## आई अशीच

आईची सावली
छकुली मी धाकली
एकुलती एकली
लेक तिची

रूप तिचं गोड ते
डोळ्यात बोलते
हसू सारं टिपते
ओठांवरी

सजली मी तशीच
साडीही अशीच
फुलंही माळली केसांत
चमक आलीय डोळ्यात

हातावर मेंदी
लाल लाल बांगड्या
कानात फुलं ही डोलणारी
अंगठी की बोटात रुळणारी

गळ्यातली माळ
आम्हा दोघींचं आभाळ
तिचंच रूप मी ल्यालेली
फुलाची कळी ही झालेली

ती खाली बसली
माझ्यासाठी धाकली
मलाही मोठ्ठं व्हायचंय
तिच्या मनातंच रहायचंय

एक दिन कसा असेल तिचा
ती श्वासाची मालकीण असताना
देव जिचं रुपडं मायेचं साकडं
ती वात्सल्यमूर्ती दिसताना

आई म्हणजे कोण गं
शरीरातले कण गं
आपलं हे मन गं
अनंत ऋण गं

आई म्हणजे देणं, शीतल चांदणं
धिटाई मिठाई गोडवा तीच
जगण्यात रस जी आणते सुरस ती
सदैव सोबतीला असते तीच

जगणंही तीच, माझं वाढणंही तीच
असणंही तीच अन नसणंही तीच
तीच स्फूर्ती ती तीच पूर्ती ती
अपूर्णताही तिच्या विना

रूपही तीच स्वरूपही तीच
दर्पण तीच प्रतिबिंबही तीच
वारसा तीच, माया प्रेमही तीच
भरलेली तीच अन पोकळी तीच
आई अशीच आई अशीच आई अशीच...

दि. ०९/०५/२१
सायं. ०६.११ वा.



## (५५)
## प्रेम कृष्ण नाव

गरज नसते प्रेम कधीही
प्रेम सुखदुःख साथ
भावनांच्या जाणीवा अन
जाण रेशीम एक आत

ते शरीरी नसते राहत
राहते हृदयांतरी
त्याही पलीकडले कधी मग
राधा आणिक श्रीहरी

रंग याचा गडद गहिरा
चढतो कधी ना उतरण्या
शिल्पे याची घडती येथे
शब्द नाहीत वर्णिण्या

चित्र प्रेमळ उमटते
पट चित्त चित्ताकर्षक
कुंचलाही प्रेमभरे मग
होई मोरपीस हर्षद

प्रेमपावा वाजतो की
सूर स्वर्गीय लहरती
कामनांचे खग उतावीळ
भावनांनी विहरती

हे असे प्रीतदिव्य मोठे
दिव्य त्याची कांती ही
भव्य करते मज मनाला
लाभते सुखशांती ही

प्रेम ऐल प्रेम पैल
प्रेम आत्मभाव
प्रेम शुद्ध सोवळं
प्रेम कृष्ण नाव

दि. ०८/०५/२१
रात्री ११.३८ वा.



## (५६)
## गंध जगण्याचा यावा

वर दाटलं आभाळ
खाली सरोवर चिंब
ढग पाहतात खाली
जळी निज प्रतिबिंब

ऐसपैस पसरला
जरा निवांत डोंगर
त्याची हिरवी दुशाली
रूप दिसते सुंदर

काठी घरकुल उभे
सृष्टीराणीच्या कुशीत
दार पापण्या मिटून
आत स्वप्नं खुशीत

त्याच्या भवताली सारा
तृण गालिचा पसरे
चालताना मऊशार
स्पर्श काट्यांचा विसरे

अशी देखणी नाजूक
पायवाट नागमोडी
जणू हातावर रेखा
आयुष्याची कुणी काढी

दूर पांघरे नीलम
रंग अंगावर नग
त्याची ओढ मोहनाची
फिरणारे मोरपीस

अशी डोलती चैतन्ये
गंध जगण्याचा यावा
सूर आसमंती नाद
ऐकू येई बघ पावा

दि. १६/०५/२१
सकाळी ०८.२७ वा.

## (५७)
## पैकं सुगंधी सुगंधी

सांगे भाकर माणसा
नगं ढेपाळू रं अस्सा
खात चटके शरीरा
खेळ आगीशीच माझा

पोट तुझं भरण्याला
खाते थापट्या अंगाला
मग तव्याशी ही झुंज
देख भाजल्या रंगाला

मग कापडं सांगती
ऐक माणसा कथेला
कपाशीचं सुत होता
पीळ पडतो देहाला

तुझ्या साठी यंत्राखाली
किती सोसतो मी हाल
ऊन वारा बी झेलतो
आपटून पिळतात

बाबा निवाऱ्याच्या साठी
खातो चिखल नि माती
विटा अंगी या रचून
छत वझ्याच बी किती

ऊन्हं वादळं झेलतो
पेलतो की सरी उरी
आत अलगद तुला
घर उबदार कुशी

सारं सारं करतो ना
गरजांना पुरविण्या
तुझ साठी घास ओठी
वस्त्र निवारा हा देण्या

का रं गळून जातोया
शक्ती गाळून बसतो
मना उभारी तू दे ना
खेळ मनाचा असतो

उठ गड्या हिमतीनं
दिस हे बी जाणारच
सुख येईल पुनांदा
जवा तू रं राबणार

नको हातावर हात
आयतं खाऊ नगं कंदी
कष्ट उपसून बघ
पैकं सुगंधी सुगंधी

कस कंबर तू घट्ट
कर मेहनत भारी
गाळ घामाच्या या धारा
बघ लक्षुमी ही दारी

दि. १६/०५/२१
सकाळी १०.१३ वा.

## (५८)
## शिकवण वैशाखाची

येतो वैशाख वैशाख
ल्येत आगीचा पोशाख
त्याचा नाच चाले खास
अंगा काहिली वनवास

चंद्र पौर्णिमेला येतो
विशाखाच्या आसपास
बहरत्या मोगरीचा
दरवळतो सुवास

सूर्य वृषभ राशीत
आग ओकतो भरात
नवं धान्य भरलेल्या
गोण्या येतील दारात

लग्नसराईची घाई
एकरूप दोन जीव
अशा काहिलीत मग
मनी वसंत सजीव

कुठे गुलमोहराला
येतो बहार बहार
रुक्ष कोरड्या हवेत
गंध अत्तरी फवार

पाणी माठातलं प्यावं
त्यात वाळयाचा सुवास
थंड पडदे घराला
उष्म्याच्या या उतारास

सरबतं पन्हे पेये
सरसर उदरात
आमराईतला आंबा
चाले रसाळी घरात

शिकवण वैशाखाची
सोस झळा दिसमास
दुःख तापलेलं आधी
मग सुखाचा प्रवास

दि. २१/०५/२१
सकाळी ०९.४७ वा.



## (५९)

## प्रेमाचे किती रूपक प्यारे

किती दिसांचे प्रेम मनातुन
साठवून हा चाफा ठेवी
कोण बरे त्याची ही रमणी
शेजारीण बकुळी ही राणी

जरा लाजरा अजून बुजरा
चाफा शांतसा सोज्वळ आहे
कसे सांगावे गूज मनीचे
आतुरतेने वाट तो पाहे

तिकडे उगवून नाजूक राणी
बकुळीची बघ खुलली ती कळी
तीही अबोली किती लाजरी
शहारली पाकळी पाकळी

मुश्किल आहे परस्परांचे
प्रेम तयांना प्रकटित करणे
चाफा न्याहळत उगा बसतसे
फांदीवर तिज सदैव पाहणे

कळले कळले वाऱ्या कळले
प्रीतीचे ते फूल उमलले
एक झुळूक ती वाहून दोघा
अंगणी त्याने असे पाठवले

पडले पडले अलगद दोघे
वाऱ्यावरती उडले दोघे
पडता गिरकी घेऊन फिरकी
चाफा म्हणाला तू मन माझे

आता सांगतो मनातले तुज
तूच प्रिया मज संगिनी केवळ
करशील माझ्या भावफुलांचा
स्वीकार हे प्रेम पवित्र निव्वळ

अशी लाजली गाली ती तर
तरारून ते अंग फुलोरे
तिला मिळाले मनातले ते
प्रेम तिच्याही जे फुललेले

मन जुळले की जुळते सारे
नाते मग हे सुंदर न्यारे
चाफ्यासंगे बकुळीच्या या
प्रेमाचे किती रूपक प्यारे

दि. २१/०५/२१
सायं. ०७.४३ वा.




## (६०)
## प्रेमाची शिदोरी वेगळी गं

अबोली बकुळीने धरलाय फेर
प्राजक्ता राणीच्या बघ चौफेर
सांग सांग कोण आहे मनी सखे तो
गाली तुझ्या हसू देऊन लपलाय जो

सोडा सोडा वाट माझी जाऊ द्या मला
असं कुणी कोंडतं का नाजूकशा फुला
कुणी नाही कुणी नाही माझया गो मना
अलवार फुलले मी सहजी पुन्हा

आज कशी वेगळीच वागलीस तू
फुलताना गालामध्ये लाजलीस तू
शुभ्र तुझ्या पाकळ्याही थरथरल्या
लाज गाली येऊनिया का बिथरल्या

नाही गं सख्यांनो, बकुळफुलांनो
अबोलीच्या राण्यांनो, समजून घ्या
वारा थोडा गारगार, झोंबला ग फारफार
म्हणून ही थरथर उमजून घ्या

कुणीतरी आहे तुझ्या मनात बसलं
आतून कुणीतरी लाडिक हसलं
लपवू नको, आम्ही सख्या तुझ्या
सांगणार नाही कुणा गोड गुपिता

कसं सांगू आला तो गं भुलला म्हणे
गंध माझा घेऊनिया डुलला म्हणे
सोन्या माझा सोनचाफा जपेन मला
कोशी त्याच्या अलगद ठेवेन मला

खरं सांगू मीही रंगरूपावर भाळले
मोहूनिया गंधावर मागे मागे चालले
आता बाई अर्पियले माझे मीच त्याला
सोनचाफा प्राजक्ताचा नुकताच झाला

कित्ती छान गोडी गं, अनुरूप जोडी गं
प्रीतीची भेट मोठी आगळी गं
एकमेका गंध द्या जीवनी सुगंध घ्या
प्रेमाची शिदोरी वेगळी गं
प्राजक्ता गालात लाजली गं

९/१२/२०२३,
१६:२३

## (६१)
## ती किनार ओली होती

मी पडले झडले कधीही
डोळ्यात आसवं दडली
ते दुःख टिपले पदराने
ती किनार ओली होती

देह झिजत गेला कायम
सुख दुसऱ्यांचे ती मानी
घोट अपमानाचे गिळता
ती किनार ओली होती

दुःखात नवऱ्याच्या डुबली
साथ खंबीर देऊन उरली
व्याकुळतेने त्या रडली
ती किनार ओली होती

सासर माहेर सांधुनी
जी उभी काठावर होती
तरी बुडलेली आकंठ
ती किनार ओली होती

सासरी मज पाठवताना
एक आसू अन हासूही
मग आतून तुटंत असता
ती किनार ओली होती

ती जख्ख म्हातारी झाली
साऱ्यांमध्ये विरघळली
अस्तित्व वेगळे नाही
लुगड्याची किनार ही ओली

ती जीवन देणारी अन
जगण्याचा अर्थही होती
ती आई माझी प्रेमळ
ती किनार ओली होती

दि. २५/०५/२१
सायं. ०६.५० वा.

## (६२)
## त्यागी असतो वंद्य निरंतर

माणूस ज्याने उदात्त ठरतो
त्याग गुण हा कठीण पण तो
ज्याला जमला संयम आपुला
संतुष्टीने त्यागी निपजतो

कर्माचे कर्तेपण त्यागून
अहंभावाला द्यावे टाकून
भौतिक सुख वा असो मानसिक
त्याग पहावा समर्पणातून

त्याग, समर्पण बोलणे सोपे
करणे इतुके अवघड बाबा
त्यागाचा नुसता विचारंही
पेलवणे हो मुश्किल तोबा

अशक्य जगणे ज्याच्या शिवाय हे
व्यक्ती, भावना, सुख, कामना
अगदी सहजी सोडता यावे
असे त्यागी मग जगती किती ना

राग अहंकार अगणित भावा
त्यागाने त्या न्यावे विलया
आधी इतरांचा विचार व्हावा
नमन करी जग त्यागी मानवा

सुखत्यागी निज परिवारास्तव
मोल तयाचे होईल, ना हो
त्याग जगत्कल्याणा घडता
आदर श्रेष्ठ बहाल होई हो

त्यागी असतो वंद्य निरंतर
सत्य अहिंसा संयम तो तर
देशासाठी जन्म उगाळून
दावी वि. दा. तात्या सावरकर

त्यागमूर्ती त्या वीरवराला
करूया शतशः नमन चला हो
पुन्हा जन्म मज लाभो तैसा
मातृभूमीस्तव तळमळला जो

दि. २८/०५/२१
सकाळी ९.११ वा.




## (६३)
## प्रतिबिंबाच्या आतून मी

कधी वाटते निरखून घ्यावे
रूप जळातुन सुंदर माझे
असले पक्षिण तरीही भाव हे
स्त्री हृदयातील समान ते ते

असे देखणे दिले रे त्याने
डोळे बोलके रेखीव चोच
रंग छटाही अंगी सुंदर
चित्रकार निर्माता तोच

इकडून तिकडे उडता उडता
उडून येती विचार काही
नितळ जळाशी बोलत रहावे
गुज मनातील वाटे पाही

आला कोणी छंदी तिकडून
टिपले चित्र हे माझे सुंदर
आणि सजविले चित्रशाळेतून
पक्षिण केली ही अजरामर

गुंग जाहले दंगून गेले
क्षणभर माझ्या रुपातून मी
जे दिसते ते स्वरूप कोठले
प्रतिबिंबाच्या आतून मी

असे मनातील दिसता सारे
जाणीव होईल आपण कोण
तो निर्माता, आपण सृष्टी
एकरूप मग नुरतो दोन

दि. ०६/०६/२१
सकाळी ०९.१३ वा.

## (६४)
## समर्पण ऐसे अलौकिक

देणे आणिक अर्पणातले
अंतर समजून घ्यावे
हळूहळू मग मनास आपुल्या
समर्पणाकडे न्यावे

देणे काही वस्तू अथवा
लौकिक क्रिया असावी
भाव मनीचे ओतून सोबत
अर्पण क्रिया घडावी

उच्च काही ते उदात्त ऐसे
ध्येय मनातून स्फुरता
अर्पण करण्या काही आपुले
विशेष यत्ने करता

अर्पण जेव्हा सम्यक होईल
खोल त्याग भावना
करता समर्पित समाधान हे
डोंगराएवढे पहा ना

जीवन भारावून जाते मग
समर्पणाची धुंदी
देव देश वा कुणी कुणास्तव
करते समर्पण हुंडी

अनूभवावी निज श्रीमंती
समर्पून काही मौलिक
रितेपणातील भरलेपण हे
समर्पण ऐसे अलौकिक

दि. ०७/०६/२१
सकाळी ०८.१४ वा.

## (६५)
## माझेच गीत मी उलगडले

जगण्यावरती माझ्या नव्याने
प्रेम असे हे मज जडले
शब्दही माझे अर्थही माझेच
माझेच गीत मी उलगडले

कधी काळी मी लिहुनी ओळी
गुरफटून अशी जात असे
क्षणा क्षणांच्या सुंदर अर्था
वेगळ्या वाटे नेत असे

कधी गुणुगुणूनी मज गीताला
पाहणे मजला जमले ना
मी दुःखाच्या शब्द जंजाळी
अशी कशी बघ रमले ना

सूर तेच लय तीच सुरेलही
शब्द वाहती भावांना
मन पाखरू आज उडावे
तोडून बंधन जाळ्यांना

उंच नभातून मुक्तपणाने
विहरत जाणे मग घडले
शब्दांनाही पंख देऊनी
माझेच गीत मी उलगडले
माझेच गीत मी उलगडले

दि. ०९/०६/२१
रात्री ११.११ वा.

## (६६)
## मृगराज

मृगराज कस्तुरी देख रे
साऱ्यांचे इरादे ना नेक रे

तुज जन्मजात वैरी किती
कुणी कातडे नि शिंगाप्रती
कुणी मांस खाण्या मारती
कुणी कस्तुरीस्तव धावती
ती कस्तुरी तू देख रे
साऱ्यांचे इरादे ना नेक रे

गुण आत आपुल्या असती जर
कुणी आकारणेचि छळती तर
ते छळणे जर ना सोडती
गुण सोडणे हे व्यर्थ की
त्या गुणांस प्रेमे देख रे
साऱ्यांचे इरादे ना नेक रे

मृगराज ऐक तू एकदा
घे शोध आतील संपदा
जातील विलया आपदा
तो शोध राहो सर्वदा
शोधास त्या नित देख रे
साऱ्यांचे इरादे ना नेक रे

दि. १३/०६/२१
रात्री ०९.३१ वा.



## (६७)
## जगणे सुंदर मोह जाळी हा

नको पाडू मोही मज
मृगा कांचना
परिणाम बोचरे
जशी सीता वंचना

असशील तू कितीही
सुंदर छान
ते देखणे रूप नि
चर्म महान

नयन निरागस
विसरून भान
वेळावून पाहशी
नाजूक मान

ती चाल दुडूदुडू
चंचल कान
मुख नाजूक सुंदर
सत्त्व निधान

परी नकोच ते
तव मोही अडकणे
मृगजळ जीवन
होत भटकणे

वरवरल्या सुंदरतेवर
भाळून
नश्वर कातडी
अशी पांघरणे

जगणे सुंदर
मोह जाळी हा
अविरत जीवन
बंदी जाळी ह्या

दि. १६/०६/२१
सकाळी ०७.३४ वा.

## (६८)
## कोष

कोष कोणते अवतीभवती
जाणीव नेणीव नुरते काही
विश्व वेगळे कल्पनेतले
जीव विणकरी विणतो पाही

कधी कोळ्यासम जाळे विणतो
कोष आपुल्या निज स्रावाचे
त्यातची जातो गुरफटून अन
जग वाटे हे सुंदर त्याचे

कधी सुरवंटी कोष सुप्तसे
पडून रहाणे निश्चल तेथे
मग जन्माने फुलपाखरू
रूप अनोखे लेवून येते

कधी अंडमय कोष घेऊनी
आपण आतून ये आकारा
भेदन करता त्या कोषाचे
सुंदर जगताचा हा पसारा

गर्भामध्ये कोष निराळे
जोडून जननीच्या जगताला
जीव बिंदूचा गोळा असूनी
संचित अनुपम ये आकारा

जन्म मृत्यूच्या मध्ये कितीतरी
कोष पांघरून जगणे असते
अन्न प्राणमय मन विज्ञानहे
कोष भेदणे सोपे नसते

हृदकोशातील आत्मतत्त्व ते
जवळी असुनी समजत नसते
जन्म घातले लक्ष तरी ते
सहजी कुणाला उमजत नसते

सारे कोष मग तोडून भेदून
रमणे जेव्हा सोडू आपण
आनंदमय निजकोषाला
नितांतसुंदर भेटू आपण

दि. १८/०६/२१
सकाळी ०८.२९ वा.

## (६९)
## **माय डोंगराची माया**

बाप टणक डोंगर
माय झालेला पाहिला
त्याच्या अंगाखांद्यावर
खेळ कवळ्या पानांचा

डोंगर पोटुशी झालाय
अगणित बीजबाळं
येत पावसाची माया
त्याचं बाळंतपण केलं

आया झाली थोडे दिस
स्वर्गातील वर्षाराणी
तिनं न्हाऊ माखू केलं
धरलं बाळसं रोपांनी

हळू वारा मामा आला
गीत अंगाई गाण्याला
तिठ लावण्याची घाई
हळव्या डोंगर आईला

नीज कुशीत घेऊन
वारा पाणी घे पिऊन
लेकरं ही मोठी होती
घट्ट मुळं सांभाळून

पहा मानव बाळांनो
जपा पाळंमुळं तुम्ही
नका विसरू कधीच
तुम्हा वाढविले ज्यांनी

दि. १५/०६/२१
सकाळी ०९.२१ वा.



## (७०)
## बाप आधार आधार

बाप आधार आधार
कणा कुटुंबाचा होई
त्याच्या खंबीर खांद्याशी
सारं घर आसराई

नाही डोळ्यात आसवं
किती काही बी घडू दे
बाप आत धुमसतो
जरी आभाळ फाटू दे

वर हासरा दिसतो
आत दुःख चरचरे
साऱ्या घरादारासाठी
जणू ब्रह्मांड त्यो फिरे

राती डोळ्याला ना डोळा
व्हती साऱ्या चिंता गोळा
आत खंगतो परी त्यो
वर कणखर बाणा

बाप रडतो रडतो
जवा पोरका होतोया
पोर पोटाची बी जवा
परक्याला देणं होया

बाप घराचं कवाड
त्याचं डोंगुर छाताड
बाप जातोया सोडून
तवा रडतं भिताड

बाप छत व्हावो देवा
किती म्हातारं ते झालं
त्याच्यामुळं म्याबी सान
डोई आभाळ झाकलं

दि.१७/०६/२१
सायं. ०५.१७ वा.
जागतिक पितृदिनानिमित्त




## (७१)
## सुंदर जगण्या जमवा भट्टी

रोज सकाळी नव्या उमेदी
नव्या कलिका फूल होऊनी
प्रकाश पसरे नवकिरणेही
नभात उतरे स्वर्ग नवाही

अंगावर मी रंग आगळे
पाहून घ्यावे रूप निराळे
छटा अशा मग प्रत्येकाने
जीवनी द्याव्या पसरून त्या रे

फुले उमलती बघता बघता
उमलून जावे आपण अलगद
चंद्रसूर्याच्या किरणांसंगे
खुशाल सांगा मनास बागड

झुलवून द्यावे आपण आपले
तनही मनही वाऱ्यावरती
उगाच येऊ द्यावी कधीही
भावभावनांना ही भरती

कशास हवे ते हेतू आणिक
उद्देशांची गोंधळ पट्टी
खुल्या मनाने श्वास मोकळे
सुंदर जगण्या जमवा भट्टी

दि. १८/०६/२१
दुपारी १२.३५ वा.




## (७२)
## **जगणे असते असे ताटवे**

असे ताटवे मना मोहविती
क्षणात फुलेच व्हावे
वाऱ्यावरती सुगंधगाणे
खुशीत डोलून गावे

कधी वाटते गुलाब व्हावे
प्रिय हृदयी विलसावे
कधी रंग वेगळेच लेऊन
अलगद उमलून यावे

आकारांची अशी विविधता
परिमळणे हुंगावे
उगाच येथे वाट वाकडी
करून कधी गुंगावे

विसरून जावे ताणतणावा
नयनसुखाची सरिता
कधी प्रियेच्या अधरांसम दल
भाव मनीचे भरता

जगणे असते असे ताटवे
फुलवून आणु कुसुमा
राखून ऐसे सुंदर बगीचे
जीवन हो अनुपमा

दि. २६/०६/२१
दुपारी १.३१ वा.



## (७३)
## फुलते मनी उद्यान

आनंदाला खेचून आणणे
नसे इतुके अवघड
ना श्रीमंती नाही गरिबी
मोद अंतरी बघ

अंगावरती कपडे सुद्धा
नसू दे काही पुरते
खेळणे मनसोक्तची एवढे
कुठे उणीव ती उरते

सुकल्या पानाची ती गाडी
भावंडाला ओढी
चित्र सुखाची जणू रांगोळी
बागेमध्ये काढी

वाचून घ्यावा निखळ खेळकर
मोद चेहऱ्यावरती
रडती पडती किती मुले
महागड्या खेळण्या तरी ती

बालपणीचे असे निराळे
आनंदाचे क्षण
जगून ज्याला घेता आले
जगणे त्याचे महान

म्हणून वाटते आनंदाचे
फुलते मनी उद्यान
मनात जागा उपजाऊ तर
उगवेल पान न पान

दि. २७/०६/२१
सकाळी ०८.१४ वा.

**(७४)**

**देवपण ते उजवं**

घाव टाकीचे सोसता
पाषाणाला देवपण
तुला घाईच माणसा
सारे उतावळेपण

नाही कष्टाची तयारी
नाही सोसण्याचे बळ
पाय भाजल्याविना का कळे
तप्त भूमी तळमळ

सूर्य तापतो तापतो
तेंव्हा तेज ते प्रचंड
दुःख सोसता सोसता
मन स्थिर हो उदंड

काट्याकुट्यातून चाले
चिखलात पाय बुडे
तेव्हा किसान रानात
पीक डौलात सापडे

नाही दमधीर थोडा
सारं लगेच ते हवं
असं कसं बा मिळेल
देवपण ते उजवं

चालो साधना सतत
आराधना निरंतर
नाम श्वासागणिक हो
तेव्हा भेटतो ईश्वर

स्पर्श त्याच्या नामाचा नि
त्याचे चिंतन करून
सुख देवाचे लाभते
दुःख सागरी बुडून

एक दिस उगवतो
सखा देव मग होतो
देवपण घेता घेता
देवपदासी हो नेतो

दि. २८/०६/२१
९/१२/२०२३, १६:३३



## (७५)
## केतकीचे उमलणे

केतकीचे उमलणे
दूर रानी वनी
काटे किती अंगावरी
परी गंध मनी

सहजीच हाताशी ती
नाही ना अंगणी
एकटीच खुले परी
ओली ती पापणी

कोण कधी येईल का
जाणता जीवनी
गूज तिचे तिच्यापाशी
ती एकटी काननी

कुणी कधी तोडुनिया
बाजारी मांडतो
तेव्हा तिचा आत्मा हा
तिजसीच भांडतो

कुणावरी केले प्रेम
दिसतो ना कुणीही
केवड्याच्या व्यथा इथे
नेणतो कुणीही

उठळपुथळ चोहीकडे
ओळखीची फुले
केतकीच्या मनी बघा
बोले जग निराळे

किती पदर पिवळेशार
उकलुनी पहावे
कांचनाच्या आत कणीस
अत्तरी दिसावे

दि. ०१/०७/२१
पहाटे ०४.२७ वा.



## (७६)
## नव्या फुलांचे रंगही घेशील

अशी प्रफुल्ल हसरी सुमने
अशी टवटवीत राखून मने
जगणे लोभस गोजिरवाणे
आयुष्याला गंधित करणे

ह्या उद्यानी लक्ष वेधती
नव्याच कोमलशा फुलजाती
आकाराने विशाल पुष्पे
परी नाजूकता अंगोपांगी

रंग गुलाबी फिकट कोवळा
अंतर्भागी बघ मधुशाला
गुंजन करुनी मधूप्राशनी
भृंगही जमती आनंदानी

तुझ्या आतल्या अशा गोडव्या
दे पसरवूनि गुणी रे सख्या
मुक्तपणे तो मध चाखू दे
जगणे तुझे ते जगता निरखू दे

फिटो डोळ्यांचे जसे पारणे
उसंत मिळू दे अंतःकरणे
बाग फुलू दे वाऱ्या झुलू दे
फुलपाखरे गुलगुलू करू दे

मग शेवटी स्वतःला पहा
चित्र देखणे जे झाले अहा
तनमन हलके आत्मा हलका
क्षणक्षण तुझाच होई बोलका

असे कृतार्थ ते जगणे पाहून
रुजण्या मातीमध्ये जाऊन
पुन्हा उमलशील बहरून येशील
नव्या फुलांचे रंगही घेशील

दि. ०५/०७/२१
सकाळी ०७.४० वा.



## (७७)
## फिटे पारणे दो नयनांचे

दवबिंदूंची माळ साजिरी
सृष्टीराणीच्या कंठी
नक्षीदार किती कुसर रेखिली
जडवणूक हिरेबंदी

नाही ओवला धागा कुठला
कुठून सांधले मोती
चमचम लुकलूक तेज पाजळे
क्षणात नभ ये हाती

रत्नहार जडविला सुरेखी
कारागिरी देखणी
असा दागिना घटकाभरी हा
पाहून घ्या लोचनी

फिटे पारणे दो नयनांचे
कर्त्याची स्वाक्षरी
रत्नपारखी कोण कोठला
अजब घडली ही सरी

वर्षा ऋतूच्या खुणा बोलक्या
लावण्याच्या ओळी
असा सोहळा टिपून घ्यावा
भाग्य उजळता भाळी

दि. ०९/०७/२१
सकाळी ०७.५३ वा.

## (७८)
## ऋतुचक्र

ऋतुचक्र भावनांचे
चाले सदा निरंतर
आयुष्य घालवावे
त्यांच्या कुशीत सुंदर

ये पावसाळा मजला
करी चिंब हा भिजवुनी
जातो मनात अगणित
आशा अशा रुजवुनी

शरदाचे चांदणे नि
हा गारवाही झोंबे
शिरवे मनात उमटून
नभ चांदव्यास लोंबे

कधी कोणता फुलावा
शिशिरातुनी रुसावा
कधी पानगळतीसम हा
मज रिक्त चि करावा

येई पुन्हा वसंत
दौडत हिरवाईने
जगण्यात पालवीची
सुखं देत बरवाईने

हा तापतो किती ना
ग्रीष्मात सूर्य वेडा
मजभोवती किती हा
दुःखांचा गे गराडा

येईल सर मोठी
शमवून वेदनांना
लाभे दिलासा ऐसा
ऋतुचक्र झेलताना

दि. १२/०७/२१
सकाळी ०८.३२ वा.

## (७९)
## प्रपात

असे कोसळू प्रपात जैसे
झोकून देऊ स्वतः
उंच कड्यावरतून मनाला
सोडून खाली आता

धबधब पडतील प्रवाह कितीसे
फेसळून ये जगणे
शुभ्र पांढऱ्या जणू हास्याच्या
लहरीतून विहरणे

सौंदर्याच्या लाटा होतील
येतील उधळीत मोदा
तुषार सारे आसमंती मग
धरतील सुरेख फेरा

शीतल शीतल हवाहवासा
वाहील अवखळ वारा
भिजवून जाईल किती दिसांनी
तनास मनास धारा

असे वहावे धबधब्यातुनी
प्रपात चिंतन व्हावे
सरसर शब्दांमधुनी येथे
काव्य सुरेल पहावे

जरा रमावे क्षणभर भिजुनी
काठावरती बसावे
शब्दजळाने आनंदाने
आवेगाने हसावे

क्षणात डोंगरमाथ्यावरूनी
पृथ्वीवर कोसळणे
अशा प्रपाती लववून पाती
स्वप्नं जरा घुसळणे

दि. १२/०७/२१
सकाळी ०९.०४ वा.



## (८०)
## आभाळमाया

माय मायेची साखर
तिचा जीव ही लेकरं
तिची माया आभाळाची
ओढ तिच्या आसऱ्याची

माय व्हतीया माऊली
जवा पोटात बाळुली
तिच्या श्वासात वात्सल्य
तिच्या डोळ्यात सावली

घासागणिक पोसती
माया रगती असती
लेकराच्या सुखासाठी
तिच्या जगण्याच्या ज्योती

ऱ्हावो कुठं बी लेकरू
मन भवताली फिरू
जसं लाडकं वासरू
तिच्या जिवाचं कोकरू

पाडसाची ती हरिणी
तिची माया पांघरुणी
घ्यावं आभाळ कुशीत
माय मायेची धरणी

दि. १२/०७/२१
सकाळी ०९.३८ वा.




## (८१)
## आनंद असू दे क्षणभरी

हे बुडबुडे क्षणभर सुखाचे
जगून घ्यावे मोकळे
का उगा चिंता कशाची
बालपण किती चांगले

येतील का हाती की नाही
ना विचारही मांडणे
आले ते पकडून क्षण खरे
हसुनी झरे खुशी सांडणे

मिळुनी जगू अवकाशी मग
पकडून घेऊ हे फुगे
कोण काय ते चिडवेल म्हणुनी
वाटणे ना वावगे

येतील जरी कोणी असे
फसवून दावण्या वाकुले
हलके जणू फुलके जगावे
बालकांसम धाकुले

आनंद असू दे क्षणभरी
भरभरूनी त्याला सांगणे
ये तू असा हाती आमुच्या
आनंदे आम्हीही वागणे

दि. १३/०७/२१
सकाळी ०८.४९ वा.



## (८२)
## जरा पाहू दे ती सुंदरता

कुणी उभारल्या वृक्ष कमानी
स्वर्गंगेची धारा
निळ्या आकाशी मार्ग चालला
शुभ पुण्याच्या द्वारा

असे वाटते मंदाकिनीच्या
जळात पुण्य फळावे
जितेपणी मज स्वर्गसुखाचे
भाग्य असे हे मिळावे

मी मग होऊन सूक्ष्मदेहाने
सहजी कुठे भ्रमावे
कधी अप्सरा होऊन पदतली
नंदनवन रमवावे

कल्पवृक्षाच्या खाली बैसून
मागून सारे घ्यावे
मनात त्याचे रोप इवलुसे
मीही रुजवून द्यावे

इथे आणल्या पारिजातका
मुळातून मी पहावे
आणि फुलांच्या किती करंड्या
गंधातून नहावे

अशी एकदा सैर घडू दे
मी सजीव असताना
काय कळे मज स्वर्ग दिला तरी
जीव गाठी नसताना

जरा पाहू दे ती सुंदरता
मला मोहू दे तरी
तुझ्या रचनेच्या प्रेमामध्ये
मला गाहू दे तरी

दि. १३/०७/२१
सायं. ०५.५३ वा.

## (८३)
## अन संध्येचा स्वर गहिवरला

मी गाताना गीत विरहिणी
उभी एकटी नदीकिनारी
प्रवाह कंपे मग भिरभिरला
अन संध्येचा स्वर गहिवरला

सागर वाटे होईल साथी
परी तयाच्या काही न हाती
खारट पाणी आसवे भरला
अन संध्येचा स्वर गहिवरला

मार्ग चालले अशी एकटी
संघर्षाची संगे दिवटी
नियती अबोल नादही विरला
अन संध्येचा स्वर गहिवरला

कधी ना लाभले सुख आठव ना
व्यर्थ मनाला वनी पाठव ना
वणवा जळजळ पेटून उठला
अन संध्येचा स्वर गहिवरला

शोभा झाली दिन जगण्याची
कलले यौवन रीत जगाची
हात आशेचा मग थरथरला
अन संध्येचा स्वर गहिवरला

जगण्याची मज पाहून धडपड
रात वेध घेताना सरसर
मिटून घेण्या काळ देखला
अन संध्येचा स्वर गहिवरला

काळा कभिन्न यमही हलला
कवितेच्या मज प्रेमी पडला
शब्द नव्हे हे व्यथा रंगल्या
अन संध्येचा स्वर गहिवरला

कसे नेऊ मग निजसदनाला
शब्द देह हिज आत्मा शब्दचि
हळवा होऊन यमही वदला
अन संध्येचा स्वर गहिवरला

जगणे मरमर मरणे सुंदर
नव्या युगाची मीच युगंधर
हास्य सजविले मुखमखराला
अन संध्येचा स्वर गहिवरला

मीच म्हणाले संध्याराणी
नको आणू तू नयनी पाणी
तूच एकली सखी धाकली
वेदनी शालू बघ जरतरला

अन संध्येचा स्वर गहिवरला
अन संध्येचा स्वर गहिवरला

दि. १५/०७/२१
दुपारी १२.४७ वा.

## (८४)

## पाझर

झिरपणं गरजेचं
काही पाझरण्यासाठी
मुरणंही गरजेचं
झरे झरण्याच्यासाठी

वर वाटतं कठीण
परी आत मऊशार
पाषाणाला लागते की
कधी आतूनच धार

डोंगराच्या कणखर
अशा पहाडी देहात
कसा कुठून साठतो
ओलावाही खोल आत

बाप टणक कठोर
आत माया सांघाळते
लेक सासुराशी जाता
माय होत रेंगाळते

सदा पाझर फुटतो
त्यास माहेर म्हणावं
अनमोल प्रेम लाभे
त्यास आहेर म्हणावं

किती ढगांमध्ये जोर
शोर गर्जत राही
पाझराच्या सोहळ्याला
सारी सृष्टी चिंब होई

अभिषेक निरंतर
डोई पाझर झिरपे
शिव होई हो प्रसन्न
जलधारांच्या किरपे

प्रेम जिव्हाळा वात्सल्य
सारं सारं पावता रे
झिरपून चित्त लेई
पाझराची नवता रे

पाझराच्या आशेपायी
किती तहानलेली मी
तुझं काळीज कठीण
किती शिणलेली मीही

नाही फुटला कधीच
एक सानुला झराही
तू ना झाला कधी माझा
तुला मोल ना जराही

दूर कोठून मिळे का
ओलाव्याचा गंध प्यारा
एक पाझरची होई
प्रीत धागा बांधणारा

दि. १६/०७/२१
सायं. ०६.५७ वा.

## (८५)
## पुन्हा गुंतलो थेंबांमधुनी

त्या पाऊस धारा वेचून गारा
रमलो मी जेथे
घर ते माझे अंगण वेडे
भिजते अजूनही येथे

ढग पिंजारले वर आभाळी
छटा पसरली काळी
एक अनामिक ओढ खेचुनी
नेतसे मजला निराळी

उनाड वारा श्रावण सारा
ओंजळीत भरताना
पिऊन थेंब मी घेऊन गारा
एकमेका मारताना

खाऊन गारा सवंगड्यांची
मस्तीत धमाल चाले
त्यावेळी मज थेंब थेंबही
गुज कानातून बोले

आज किरकिरा झालो मी तर
कशास पाऊस आला
कामावर मी जाण्यासाठी
होऊन गेलो ओला

विसरून गेलो बालपणीचे
ऋतू अंगावर झेलून
जीव इवलुसा परी आनंदा
डोंगराएवढे पेलून

पुन्हा गुंतलो थेंबांमधुनी
धारा मनी कोसळल्या
गावाकडचा घर ओलावा
गंधकळ्या उमलल्या

दि. २२/०७/२१
सकाळी ०८.१३ वा.



## (८६)
## चरित्र

चरित्र माझे घडवीन ऐसे
जगताला कौतुक
कार्य एवढे सोडीन मागे
हे विश्व होई उत्सुक

साहित्याच्या प्रांतामध्ये
लहरून मी फडकेन
शब्दांमधल्या सखोल ऐशा
भावांतुन अडकेन

भाषा माझ्या ओठांवरती
सजून त्या बसतील
अंतरातले गुज मनीचे
स्मितपणे हसतील

इकडून तिकडे अनुवादाचे
सेतू मी बांधीन
भाषा सुंदर विचार मौलिक
सहजी मी सांधीन

वक्तव्याच्या चांदण्यातुनी
रसिकवरांनी भिजावे
प्राजक्ताचे ओघळणारे
सुधामृत प्राशावे

शिकवीन ऐसे तल्लीनतेने
जन्म पुरे ना होई
ज्ञानदीप उजळून तेवतील
मुखी शारदा माई

मी जातांना परलोकाला
चरित्र येथे ठेवीन
शब्दाशब्दांमधून माझी
पदचिन्हे उमटवीन

दि. २५/०७/२१
सकाळी ०८.५८ वा.

## (८७)
## हळवे सुगंध सजवावे

कुठे गेली ती मातीमधली
प्रामाणिकशी नाती
धन दौलत ना खेळे परंतु
माया उदंड हाती

कुणी कुणाच्या सेवेसाठी
आपुलकीने वागे
कृतार्थ त्याच्या मनातून ते
भाव राहती जागे

रुतला काटा जर कोणाला
हळहळ सारे करती
गाव एक ते घर होऊनी
एकदिलाने त्वरती

सुख असो वा असू दे दुःख
डोळ्यातून झरताना
आज पापण्या ओल्या माझ्या
ते सारे स्मरतांना

पाऊस होता प्रेमाचा तो
अंगणी रुजून जाई
मला कोरडे करण्यासाठी
धावे भिजून आई

आठवणींच्या पाऊसधारा
मनास मी भिजवावे
तशा उमलत्या नात्यांसाठी
हळवे सुगंध सजवावे

दि. २२/०७/२१
सकाळी ०८.३६ वा.



## (८८)
## जगण्याला मेजवानी

तरारलं रान सारं
पात्या लवलवणाऱ्या
अंगी रेशीम सांडली
राण्या हुळहुळणाऱ्या

रंग मनात साठवा
गोड आठवा आठवा
झोपडीत माझ्या अशा
प्रीत गाण्याला पाठवा

गर्द हिरवी ही झाडी
पाठी पाठराखी डोले
रंगसोहळे सगळे
हिरवाईचे दंगले

वारा गंध हुंगणारा
द्वाड पदराशी खेळे
लाडलाडात चालले
त्याचे अवखळ चाळे

हवा ताजी नि तवानी
तरतरी तनी मनी
उगा टेकता जरासे
जगण्याला मेजवानी

नको कसली दौलत
सारं उधळून द्यावं
सृष्टिसंगं रमताना
फुल मनी उमलावं

दि. २५/०७/२१
सकाळी ०८.३२ वा.

## (८९)
## रिक्तपणे मन सावर

देऊन सारे होता यावे
अलगद ऐसे रिक्त
जसे समर्पून सारे काही
भरून पावतो भक्त

भरण्यासाठी नवीन काही
द्या सोडून आसक्त
मिळवून घेण्या नकोच त्रागा
अधिकार नि ते हक्क

कधी वाटते मनास माझ्या
पुरवून द्यावे हट्ट
बिलगून राही आत्मविचारी
पकडून ठेवी घट्ट

कधी कितीही जरी वाटले
होऊ नये मग व्यक्त
वरवर पाहून वाटू दे जरी
माणुसघाणा सक्त

भोगून घ्यावे भोग आपुले
संचित समजून फक्त
कुठे जाणिवा जपती तरीही
संतती आपुले रक्त

व्हावे हलके फुलके मन हे
ओझे नको तयावर
या जगताची सैर वेगळी
रिक्तपणे मन सावर

दि. २६/०७/२१
सकाळी ०९.१५ वा.



## (९०)
## पावलात जान आली

रक्ताळल्या भेगाळल्या
पावलांचा तू दिलासा
कष्ट किती साहिलेले
नातवंडं होय आशा

आलो शेतात राबून
आला आला तू धावून
अंगावरी विसावला
दिस ढळता हसला

लेकराचं तू लेकुर
कित्ती लाडाचं कोकुर
जीव तुझ्यात गुंतला
गुंता साराच संपला

तुझं खळाळून हासू
डोळा आनंदाचं आसू
सावळ्या रुपड्यात मला
बाळकृष्ण लागे दिसू

कशी माया जडतीया
अशी जादू घडतीया
न्हाई थकलेला आज्जा
मरगळ झडतीया

तुझी कवळी पावलं
नगं कष्टानं हो वलं
देवा नातवा दिलंस
सारं भरून पावलं

पावलात जान आली
तुझी पावलं बोलली
भेगा पळाल्या कवाच
जगण्यास धार आली

दि. १८/०८/२०२२
सकाळी ०७.१९ वा.



## (९१)
## **सुखा बिलगते पाती**

असेच धरते सावरून मी
सुख बिंदूला वेडी
आयुष्याच्या उतरणपाती
थबकून काही नाती

कधी येऊनि सर सुखाची
बरसून थोडी जाते
ग्रीष्म पोळका जाळी तनमन
होरपळून मी जाते

गळती झडती जीवनपाती
सुकून जाती पाने
दुःख केवढे कठोर निर्दयी
करपून टाकिले याने

ऋतू बदलता बदले सारे
शीतल वारा होई
आल्हादाची फुंकर घालून
जगण्या कोंब हा येई

आशा वाढे भरभर भरभर
रूप नवाळी सजते
दवबिंदूंची अशी मालिका
अंगावरती रुजते

रुजली नाती दव हे गाती
शहारलेल्या राती
पहाट येते दवास घेते
सुखा बिलगते पाती

दि. २७/०७/२१
पहाटे ०४.१३ वा.



## (९२)
## जरा उंबऱ्यापाशी थांबून

किलकिले करूनी दार थोडे मी
डोकावून पाहते
जरा उंबऱ्यापाशी थांबून
झेप नवी मी घेते

सज्ज जाहले जगतामध्ये
मज कौशल्ये नेण्या
निज विश्वासे विश्वा साऱ्या
नतमस्तक ते करण्या

वय धाकुले पाऊल इवले
इमले मोठे माझे
मनात रचले जाते आधी
काहीही मग गाजे

अंधाराची नाही तमा मज
घरास उजळीन साऱ्या
एक झरोका ठेवीन मोठा
तेजाच्या मग फेऱ्या

भूतकाळ अंधारी गाडुनी
वर्तमान मज पायी
भविष्य येईल चमकत दमकत
मज दाराच्या ठायी

दि. २७/०७/२१
सकाळी ०९.११ वा.

## (९३)
## सारं देऊन डोंगर

एक डोंगर उभा की
होऊन युगे दाता
वरुणाला अडवितो
बनून त्याचा भाता
भात्यात विसावले
शर येती सर सर
इथं युगंधरेवर
वर्षाराणीचा सत्कार

कुठे कोसळे माथ्याशी
पाणी मुसळधारेने
आल्या पाण्याला दे वाट
डोंगर गा त्वरेने
विखुरलेल्या पाण्यास
एक मार्ग मिळे छान
खळखळून वाहतो
एक स्रोत होई सान
जसजसे येत जाई
पाणी पुढे वाहताहे
देण्याच्या गुणधर्मे
धबधबा हो महान

कर्तृत्व डोंगराचे
परि लोभ ना किंचित
जलजीवन तो देई
न राहण्या वंचित
पाण्याला अमृताची
चव येई हो त्या क्षणी
गोड, मधुर ते पाणी
चिर राहे अंतर्मनी

खेळे अल्लड ते कोणी
चिंब ओल्या बालपणी
जलक्रीडा त्या यौवनी
धुंद साजन सजनी
जिणे निसटून जाते
वाटे तीरी वृद्धपणी
कोणा काहीही वाटावे
पाणी पुढे वाहताहे
मग राबत्या हातांनी
भुई अंकुरत आहे
पाण्याचा होई दाणा
मुखात जातो जेव्हा
डोंगर, धबधबा
कृतकृत्य होई तेव्हा

काय सांगतो डोंगर
जे आहे सारे द्याना
देण्यात सारा आनंद
एवढंसं समजून घ्याना
दाता राहतो अढळ
उंच डोंगरासारखा
दानाचे पुण्य होऊन
होई दुःखाला पारखा

सारं देऊन डोंगर
होई सौंदर्याचा घाट
दनाने मिळे मान
सारे विश्व पाही थाट

दि. ९/१२/२०२३,
दुपारी १६:५७

## (९४)
## मालवताना कुडी जीवाची

मालवताना कुडी जीवाची
तगमग तगमग कशास ती
सोड खुणा आपुल्या कर्माच्या
मुक्त निरव शांतीत गती

धावून धावून दमले तन तरी
मनास नाही स्थिरता कधी
हव्याहव्याच्या हव्यासातच
खऱ्या हव्याची आस खुजी

कळले जरी तरी वळणे नाही
रखडत खरडत जन्म लुळा
किती वाचले ग्रंथ तरीही
माणूस राही असा खुळा

अनुभवाच्या गठडीचेही
पुरून टाकतो तो संचित
पैलतीराच्या गावा निघता
ऐला सोडणे ना किंचित

जे येणारे खरे सोबती
त्यांची किंमत नाही कधी
सोडून देती उंबऱ्यातुनी
शवास मरतो त्यांसाठी

म्हणून सांगते ऐक जीवा रे
ठेव ठेवण्या उत्तम काही
अशी निर्मिती घडू दे हाती
मालवताना कुडी जीवाची

दि. २९/०७ २१
सकाळी ०९.१९ वा.

## (९५)
## वेदनेचे घोट

वेदनेचे घोट गिळता अश्रू नयनी ओघळती
मर्माघाती घाव ऐसे, अश्रुरूपे पाझरती
एक अश्रू बिंदु होऊन, गालावरी विसावू पाहे
वेदनेला अंत कोठे, बिंदू अवली धार वाहे
किती दुःखे झेलली मी, अश्रू माझे सोबती
खडतरीच्या जीवनाचे, चढउतारे सांगती
जीवनाचे साथी झाले, साथीदारे वंचिता,
जायबंदी मी अशी की, जन्मबंदी अंकिता
संगती मज अश्रू ऐसे, वेदना वा मोदना
सुख नसे घर शाश्वताचे,
दुःख दे संवेदना
संवेदनेने जाणिले मी,
हृदयांतरीच्या कल्लोळा
सुख पाहता होती जसे, भवती सकळजन हे गोळा
क्षण आंतरिक आनंद देतो,
तेथेही अश्रू उभा
म्हणतो कसा ... प्रिय साजणी,
मी आज आहे बरवा
उष्ण दाहे पोळलीस तू
मी आज ल्यालो गारवा
शब्द त्याचे ऐकताना, मी साथ त्यालाही दिली
एक अश्रू सोबतीने,
सांगता देखणीच झाली

दि. ९/१२/२०२३,
दुपारी १६:५४

## (९६)
## तक्रार

रोज एक नवी पहाट
पाहत असतेच ना वाट
कशाला मावळत्या सूर्याची
तक्रार करावी बरे?

रोज पाण्यावरती अशी
उसळून येतेच ना नवी लाट
कशाला विरणाऱ्या लाटेची
तक्रार करावी बरे?

प्रत्येक नदीला साथ देतोच
तिचा तिचा आपलासा काठ
तो कोरडाच का म्हणून
तक्रार करावी बरे?

आयुष्यभर सरळ राहून
मानही ज्याने ठेवली ताठ
तोच कणा म्हातारपणी वाकला म्हणून
तक्रार करावी बरे?

कधीतरी एवढे जंजाळ
डोक्यावरती केसही दाट
आता विरळ होत गेले म्हणून
तक्रार करावी बरे?

तक्रारींचे काय हो
ती असत्या नसत्या अशा
साऱ्याच परिस्थितीत डोकं वर काढणारंच
तिची तरी कशाला उगाच
तक्रार करावी बरे?

दि. ३०/१२/२०२२
सकाळी ०७.२९ वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा :** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), बकुळफुले (फुलांवरील कविता), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी–जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड–गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग–निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप–स्वरूप (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), अळुमाळु (फुले), सुरभी (फुले), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी (स्त्रीजीवन – भाग १), मृणालिनी (स्त्रीजीवन – भाग २), प्रमिला (धरती–आकाश), लाघव वेळा (सकाळ–संध्याकाळ), मनमंदिरा (जीवनपर कविता) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग–१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात – डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके –**

(राधाकृष्ण) – श्रीरंग, कृष्णकांत, (निसर्गपर) – सृष्टीगंध, (वेळा) – तेव्हा, (त्याच्यावरील प्रीत कविता) – प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, (मिश्र कविता) – गंधराणी, हृदयस्पर्शी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) – सहा सोहळे, नभ मोजताना, (जीवनपर) – तेजशलाका, उदय, मंजुभारती, (पाऊस कविता) – श्रावणी, (गझल) – उल्का, (रसिकप्रतिक्रिया – कवीश्वर) – बोल बरवे, (अन्य रसिक प्रतिक्रिया) –प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) – जरा रेंगाळले, (Audio - Book) – युगंधरा, कामिनी, (रंग) – रंगतनु, (गझल) – मनस्विनी, (सर्वोत्कृष्ट कविता) – माझी कविता, (ललितलेख) – मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री मुलाखत, दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialshare buttons |
| ३ | ''आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे.'' साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय<br>राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/maha_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/maha_governor/status/1439559859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान<br>'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश आमटे यांच्या आत्मचरित्राचा संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी 'प्रकाशमार्गाः' | https://www.loksatta.com//lokrang/sahitya-akademi-award-for-translation-autobiography-of-prakash-amte-poet-prof-dr-manjusha-kulkarni-prakashwata-zws-70-2612674/lite/?utm_source=whatsapp_web&utm_medium=social&utm_campaign=socialsharebuttons |
| ७ | https://mr.wikipedia.org | https://mr.wikipedia.org/wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा महाराष्ट्र राज्याच्या मा. राज्यपालांच्या हस्ते अभिनव साहित्यिक विक्रम केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com MahaGovtMic/status 1476551366352924672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/InfoVidarbha/status/1418559733921816580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर डॉ. मंजूषा कुलकर्णी सखी सह्याद्री - डीडी सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/ITLxInwuJc ; https:/youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह डॉ.मंजूषा कुलकर्णी / नवरात्री स्पेशल / सकाळ मीडिया | https://youtu.be/m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=126653335052919 8id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम – ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम – ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ६९
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ३४
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

● ● ●